सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**विधि व न्याय विभाग**

**सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४**

# महाराष्ट्र विलीन संस्थाने (विधि) अधिनियम

(दिनांक २६ जानेवारी २०१६ पर्यंत सुधारित)

## Bombay Act No. IV of 1950

# The Maharashtra Merged States (Laws) Act

( *As modified upto the 26th January 2016* )

*

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांनी भारतात मुद्रित केले व संचालक,
शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय महाराष्ट्र राज्य,
मुंबई ४०० ००४ यांनी प्रकाशित केले

**२०१६**

[ **किंमत :** रुपये ४०.०० ]

## (सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४)

# महाराष्ट्र विलीन संस्थाने (विधि) अधिनियम

---

**अनुक्रमणिका**


**उद्देशिका.**

**कलमे.**

१. लघुसंज्ञा. .. .. .. .. .. २

२. व्याख्या. .. .. .. .. .. २

३. विधि लागू करणे. .. .. .. .. .. २

४. तत्सम विधि रद्द करणे. .. .. .. .. २

५. विवक्षित विधि विवक्षित संस्थानात अंमलात असण्याचे चालू राहील. .. ३

६. मुदतीसंबंधी बचाव. .. .. .. .. .. ३

७. रद्द करणे. .. .. .. .. .. ४

**पहिली अनुसूची** .. .. .. .. .. ४

**दूसरी अनुसूची** .. .. .. .. .. ८

**तिसरी अनुसूची** .. .. .. .. .. १६

## सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४

## [ महाराष्ट्र विलीन संस्थाने (विधि) अधिनियम ]

**[ ३० मार्च १९५० ]**

ह्या अधिनियमांत पुढील आदेश व अधिनियम याअन्वये अनकूलन, रुपभेद व सुधारणा करण्यात आल्या आहेत :—

सन १९५० चा मुंबई अधिनियम ४४.

सन १९५० चा मुंबई अधिनियम ४६.

सन १९५१ चा मुंबई अधिनियम २१.

सन १९५१ चा मुंबई अधिनियम ३२.

सन १९५१ चा मुंबई अधिनियम ३६.

सन १९५२ चा मुंबई अधिनियम १२.

सन १९५२ चा मुंबई अधिनियम २४.

सन १९५३ चा मुंबई अधिनियम २१.

सन १९५३ चा मुंबई अधिनियम ४९.

सन १९५५ चा मुंबई अधिनियम ४५.

सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम २४.

**मुंबई राज्याचे भाग म्हणून कारभार चालविण्यात येत असलेल्या विवक्षित क्षेत्रांत विवक्षित अधिनियम व विनियम लागू करण्याबाबत अधिनियम.**

२६ जीईओ ५. सीएच २.

ज्याअर्थी विलीन संस्थानांत समाविष्ट असलेली विवक्षित क्षेत्रे मुंबई प्रांताच्या भाग असल्याप्रमाणे त्यांचा कारभार चालविण्यासाठी भारत शासन अधिनियम, १९३५, कलम २९० अ अन्वये दिलेल्या आदेशानुसार तरतूद करण्यात आली आहे ;

सन १९४९ चा मुंबई अध्या. क्र. सहा.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ८८ या अन्वये मुंबई विलीन संस्थाने (विधि) अध्यादेश, १९४९, प्रसिद्ध करण्यात आला व त्याअन्वये विवक्षित अधिनियम व विनियम उक्त विलीन संस्थांना लागू करण्यात आले आहेत ;

आणि ज्याअर्थी, मुंबई राज्याच्या प्रदेशात उक्त विलीन संस्थानाचे प्रदेश आता समाविष्ट झाले आहेत ;

आणि ज्याअर्थी, विवक्षित अधिनियम व विनियम उक्त क्षेत्रास लागू करणे इष्ट आहे ;

त्याअर्थी, याअन्वये पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात आला आहे :—

लघुसंज्ञा. **१.** ह्या अधिनियमास [१][ महाराष्ट्र विलीन संस्थाने (विधि) अधिनियम ] असे म्हणावे.

व्याख्या. **२.** ह्या अधिनियमांत " विलीन संस्थाने " या संज्ञेचा अर्थ संस्थाने विलीनीकरण (गव्हर्नर प्रांत) आदेश, १९४९, यात तिचा जो अर्थ दिलेला असेल तोच असेल.

विधि लागू करणे. **३.** (१) पहिल्या अनुसूचीमध्ये निर्दिष्ट केलेले सर्व अधिनियम व विनियम आणि दुसऱ्या अनुसूचीमध्ये निर्दिष्ट केलेल्या अधिनियमाचा व अध्यादेशाचा जेवढा भाग राज्य विधान मंडळास ज्याबाबत विधि संमत करण्याचा अधिकार आहे अशा बाबींसंबंधी असेल तेवढा भाग हे याअन्वये विलीन संस्थानांस लागू करण्यात आले आहेत आणि त्यात ते अंमलात राहतील.

(२) तिसऱ्या अनुसूचीच्या पहिल्या आसनात निर्दिष्ट केलेले अधिनियम दुसऱ्या आसनात निर्दिष्ट केलेल्या विलीन संस्थानांना लागू करताना त्यात उक्त परिशिष्टाच्या तिसऱ्या आसनात दिलेल्या रीतीने सुधारणा करण्यात यावी.

(३) (अ) कंडिका (ब) व कलम ४, पोट-कलम (१), याचे परंतु यांच्या उपबंधास अधीन राहून, याअन्वये विलीन संस्थानांना लागू करण्यात आलेला कोणताही अधिनियम, अध्यादेश किंवा विनियम याअन्वये केलेल्या सर्व नेमणुका, केलेले सर्व उपविधि व नियम व विनियम, सोपविलेल्या सर्व गोष्टी, काढलेल्या सर्व अधिसूचना आणि दिलेले सर्व आदेश विलीन संस्थानांना लागू करण्यात आले आहेत आणि त्यात अंमलात राहतील असे समजले पाहिजे.

(ब) जेव्हा निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही स्थानिक क्षेत्राच्या बाबतीत कोणतीही अशी नेमणूक करण्यात आली असेल, कोणताही असा उपविधि, नियम किंवा विनियम करण्यात आला असेल, कोणतीही अशी गोष्ट सोपविण्यात आली असेल अथवा कोणताही असा आदेश देण्यात आला असेल तेव्हा तो त्या त्या वेळी विधिअन्वये अशा स्थानिक प्रदेशात समाविष्ट केलेल्या विलीन संस्थानांच्या कोणत्याही क्षेत्रास लागू आहे व तसेच तो अशा क्षेत्रात अंमलात राहील असे समजले पाहिजे.

तत्सम विधि रद्द करणे. **४.** (१) ह्या अधिनियमाच्या सुरुवातीच्या निकटपूर्वी कोणत्याही विलीन संस्थानांत पहिल्या अनुसूचीमध्ये किंवा दुसऱ्या अनुसूचीमध्ये निर्दिष्ट केलेला अधिनियम, अध्यादेश किंवा विनियम यासारखा एखादा अधिनियम, अध्यादेश किंवा विनियम अंमलात असेल तर मग तो प्रांतबाह्य क्षेत्राधिकार अधिनियम, १९४७, अन्वये काढलेल्या ज्या आदेशावरून तो अधिनियम, अध्यादेश किंवा विनियम लागू करण्यात आला असेल त्या आदेशापरत्वे अंमलात असो किंवा इतर कोणत्याही विधायिनी शक्तिपरत्वे अंमलात असो-पहिल्या अनुसूचीमध्ये निर्दिष्ट केलेला अधिनियम किंवा विनियम यासारखा असलेला असा विधि हा किंवा दुसऱ्या अनुसूचीत निर्दिष्ट

१९४७ चा सत्तेचाळीस.

---

१. सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या अनुसूची द्वारे " मुंबई विलीन संस्थाने (विधि) अधिनियम, १९५० " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

केलेल्या अधिनियमाचा किंवा अध्यादेशाचा जेवढा भाग राज्य विधान मंडळास ज्याबाबत विधिसंमत करण्याचा अधिकार आहे अशा बार्बीसंबंधी असेल तेवढ्या भागासारखा असलेला अशा विधीचा कोणताही भाग, हा अधिनियम अंमलात आल्यानंतर कोणत्याही अशा विलीन संस्थानांत अंमलात राहणार नाही :

परंतु, विलीन संस्थानाचे जे कोणतेही क्षेत्र बनासकांठा, साबरकांठा, मेहसाना, अमरेली, बडोदे व कोल्हापूर या जिल्ह्याचा भाग बनलेले असेल त्याच केवळ क्षेत्राच्या बाबतीत अशा विधिअन्वये किंवा अशा विधिच्या कोणत्याही भागाअन्वये ज्या नेमणुका करण्यात आल्या असतील, ज्या गोष्टी सोपविण्यात आल्या असतील, ज्या अधिसूचना काढण्यात आल्या असतील, जे आदेश देण्यात आले असतील आणि जे उपविधि, नियम व विनियम करण्यात आले असतील आणि अशा ज्या नेमणुका, गोष्टी, अधिसूचना व असे जे आदेश, उपविधि, नियम व विनियम ह्या अधिनियमाच्या सुरुवातीच्या निकटपूर्वी अशा कोणत्याही क्षेत्रात अंमलात असतील ते सर्व कलम ३ अन्वये विलीन संस्थानांस लागू करण्यात आलेला अधिनियम, अध्यादेश किंवा विनियम याच्या तत्सम उपबंधान्वये करण्यात, काढण्यात किंवा देण्यात आले आहेत असे समजले पाहिजे आणि सक्षम प्राधिकाऱ्याकडून त्यात फेरफार करण्यात किंवा ते रद्द करण्यात किंवा त्यात सुधारणा करण्यात येईपर्यंत ते अंमलात असण्याचे चालू राहील.

(२) पोट-कलम (१) मधील उपबंधांच्या सामान्यतेस बाध येऊ न देता आणि त्यास अधीन राहून, चौथ्या अनुसूचीमध्ये निर्दिष्ट केलेले अधिनियम अंमलात राहणार नाही व ते यान्वये रद्द करण्यात आले आहेत.

विवक्षित विधि विवक्षित संस्थानात अंमलात असण्याचे चालू राहील.

**५.** मागील उपबंधात काहीही असले तरी पाचव्या अनुसूचीच्या पहिल्या आसनात निर्दिष्ट केलेले अधिनियम हे, त्या अनुसूचीच्या दुसऱ्या आसनात निर्दिष्ट केलेल्या विलीन संस्थानात, जणू ते राज्य विधान मंडळाने केले होते असे समजून, उक्त विधान मंडळाकडून किंवा कोणत्याही इतर सक्षम प्राधिकाऱ्याकडून त्यात फेरफार करण्यात किंवा ते रद्द करण्यात किंवा त्यात सुधारणा करण्यात येईपर्यंत, अंमलात असण्याचे चालू राहील.

मुदतीसंबंधी बचाव.

१९०८ चा नऊ. १९४७ चा सत्तेचाळीस.

**६.** ह्या अधिनियमात काहीही असले तरी, कोणताही दावा, अपील किंवा अर्ज यासाठी भारतीय मुदत अधिनियम, १९०८ अन्वये विहित केलेली मुदत ही, भारतीय मुदत अधिनियम, १९०८ कोणत्याही विलीन संस्थानास लागू करण्याबाबत प्रांतबाह्य क्षेत्राधिकार अधिनियम, १९४७ अन्वये दिलेला आदेश अंमलात येण्याच्या निकटपूर्वी अशा संस्थानात अंमलात असलेल्या कोणत्याही तत्सम विधिन्वये विहित केलेल्या मुदतीपेक्षा कमी असेल तर, असा दावा, अपील किंवा अर्ज असा आदेश अंमलात आल्याच्या तारखेच्या लगतनंतर दोन वर्षांच्या आत किंवा अशा तत्सम विधिन्वये विहित केलेल्या मुदतीच्या आत, यापैकी जी मुदत प्रथम संपत असेल त्या मुदतीच्या आत, दाखल करता येईल.

रद्द करणे. **७.** मुंबई विलीन संस्थाने (विधि) अध्यादेश, १९४९ ह्या अन्वये रद्द करण्यात आला आहे आणि याअन्वये असे जाहीर करण्यात येते की, मुंबई सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४, कलम ७ याचे उपबंध हे, जणू उक्त अध्यादेश हा अधिनियम आहे असे समजून तो रद्द करण्याच्याबाबतीत लागू होतील. १९४९ चा मुंबई अध्या. क्र. सहा. १९०४ चा मुंबई एक.

## पहिली अनुसूची

मुंबई विनयम, १८२७ (सन १८२७ चा विनियम ८).

फौजदारी न्यायालये (आज्ञापत्राच्या ऐवजी पत्रे पाठविण्यासंबंधी) विनियम, १८२७ (सन १८२७ चा विनियम १३).

मुंबई विनियम, १८२७ (सन १८२७ चा विनियम २५).

बाजार व जागा अधिनियम, १८६२ (सन १८६२ चा मुंबई अधिनियम ४).

मुंबई बाष्पजलयान अधिनियम, १८६४ (सन १८६४ चा मुंबई अधिनियम २).

मुंबई उच्च न्यायालय (लेटर्स पेंटट) अधिनियम, १८६६ (सन १८६६ चा अधिनियम २३).

मुंबई ग्राम पोलीस अधिनियम, १८६७ (सन १८६७ चा मुंबई अधिनियम ८).

मुंबई तरी व अंतर्देशीय जलयाने अधिनियम, १८६८ (सन १८६८ चा मुंबई अधिनियम २).

मुंबई दिवाणी न्यायालय अधिनियम, १८६९ (सन १८६९ चा अधिनियम १५).

दिवाणी तुरुंगाबाबत अधिनियम, १८७४ (सन १८७४ चा मुंबई अधिनियम २).

रस्ते व पूल यांवरील दस्तुरी अधिनियम, १८७५ (सन १८७५ चा मुंबई अधिनियम ३).

मुंबई महसूल क्षेत्राधिकार अधिनियम, १८७६ (सन १८७६ चा अधिनियम १०)

मुंबई जमीन महसूल अधिनियम, १८७९ (सन १८७९ चा मुंबई अधिनियम ५).

मुंबई पाटबंधारे अधिनियम, १८७९ (सन १८७९ चा मुंबई अधिनियम ७).

मुंबई लॅडिंग व व्हार्फेज फी अधिनियम, १८८२ (सन १८८२ चा मुंबई अधिनियम ७).

मुंबई सार्वजनिक प्राधिकारी शिक्के अधिनियम, १८८३ (सन १८८३ चा मुंबई अधिनियम ५).

यात्रेकरू संरक्षण अधिनियम, १८८७ (सन १८८७ चा मुंबई अधिनियम २).

मुंबई जुगार प्रतिबंध अधिनियम, १८८७ (सन १८८७ चा मुंबई अधिनियम ४).

मुंबई ग्राम आरोग्यरक्षण अधिनियम, १८८९ (सन १८८९ चा मुंबई अधिनियम १).

मुंबई जिल्हा पोलीस अधिनियम, १८९० (सन १८९० चा मुंबई अधिनियम ४).

मुंबई नगरपालिका सेवक अधिनियम, १८९० (सन १८९० चा मुंबई अधिनियम ५).

मुंबईच्या जिल्ह्यात देवी टोचण्याबाबत अधिनियम, १८९२ (सन १८९२ चा मुंबई अधिनियम १).

मुंबई जिल्हा नगरपालिका अधिनियम, १९०१ (सन १९०१ चा मुंबई अधिनियम ३).

मुंबई सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४ (सन १९०४ चा मुंबई अधिनियम १).

मुंबई प्रतिपालक अधिकरण अधिनियम, १९०५ ( सन १९०५ चा मुंबई अधिनियम १).

मामलतदार न्यायालय अधिनियम, १९०६ (सन १९०६ चा मुंबई अधिनियम २).

मुंबई शर्यत मैदान लैसेन्स अधिनियम, १९१२ (सन १९१२ चा मुंबई अधिनियम ३).

मुंबई वैद्यक अधिनियम, १९१२ (सन १९१२ चा मुंबई अधिनियम ६).

मुंबई धूर उपद्रव अधिनियम, १९१२ (सन १९१२ चा मुंबई अधिनियम ७).

मुंबई नगररचना अधिनियम, १९१५ (सन १९१५ चा मुंबई अधिनियम १).

मुंबई सार्वजनिक वाहने अधिनियम, १९२० (सन १९२० चा मुंबई अधिनियम ७).

मुंबई वकील अधिनियम, १९२० (सन १०२० चा मुंबई अधिनियम १७).

मुंबई करमणूक कर अधिनियम, १९२३ (सन १९२३ चा मुंबई अधिनियम १).

मुंबई स्थानिक मंडळ अधिनियम, १९२३ (सन १९२३ चा मुंबई अधिनियम ६).

मुंबई वेश्याव्यवसाय प्रतिबंध अधिनियम, १९२३ (सन १९२३ चा मुंबई अधिनियम ११).

मुंबई अपमिश्रण प्रतिबंध अधिनियम, १९२५ (सन १९२५ चा मुंबई अधिनियम ५).

मुंबई पण कर अधिनियम, १९२५ (सन १९२५ चा मुंबई अधिनियम ६).

मुंबई सहकारी संस्था अधिनियम, १९२५ (सन १९२५ चा मुंबई अधिनियम ७).

मुंबई बरो नगरपालिका अधिनियम, १९२५ (सन १९२५ चा मुंबई अधिनियम १८).

हिंदु धार्मिक विधि उपलब्धी अमान्यता अधिनियम, १९२६ (सन १९२६ चा मुंबई अधिनियम ११).

मुंबईचा शेतकरी नसलेल्या इसमांना कर्जे देण्याबाबत अधिनियम, १९२८ (सन १९२८ चा मुंबई अधिनियम ३).

मुंबई प्रसुति साहाय्य अधिनियम, १९२९ (सन १९२९ चा मुंबई अधिनियम ७).

मुंबई बोर्स्टल शाळा अधिनियम, १९२९ (सन १९२९ चा मुंबई अधिनियम १८).

मुंबई स्थानिक निधी हिशोब तपासणी अधिनियम, १९३० (सन १९३० चा मुंबई अधिनियम २५).

मुंबई वजने व मापे अधिनियम, १९३२ (सन १९३२ चा मुंबई अधिनियम १५).

मुंबई (जिल्हा) तंबाखू अधिनियम, १९३३ (सन १९३३ चा मुंबई अधिनियम २).

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९३३ (सन १९३३ चा मुंबई अधिनियम ६).

मुंबई पशुधन सुधारणा अधिनियम, १९३३ (सन १९३३ चा मुंबई अधिनियम २२).

मुंबई उद्योगधंदे विवाद समेट अधिनियम, १९३४ (सन १९३४ चा मुंबई अधिनियम ९).

मुंबई देवदासी संरक्षण अधिनियम, १९३४ (सन १९३४ चा मुंबई अधिनियम १०).

मुंबई परिचारिका, सूतिका व आरोग्य अवेक्षिका नोंदणी अधिनियम, १९३५ (सन १९३५ चा मुंबई अधिनियन ७).

मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी अधिनियम, १९३५ (सन १९३५ चा मुंबई अधिनियम २५).

मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, १९३५ (सन १९३५ चा मुंबई अधिनियम ३४).

मुंबई दुष्काळ निवारण निधी अधिनियम, १९३६ (सन १९३६ चा मुंबई अधिनियम १९).

मुंबईचा अफू ओढण्याबाबत अधिनियम, १९३६ (सन १९३६ चा मुंबई अधिनियम २०).

मुंबई पारशी सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी अधिनियम, १९३६ (सन १९३६ चा मुंबई अधिनियम २३).

मुंबईचा तात्पुरते कर वसूल करण्याबाबत अधिनियम, १९३८ (सन १९३८ चा मुंबई अधिनियम ४).

मुंबई अपराधी परिवीक्षा अधिनियम, १९३८ (सन १९३८ चा मुंबई अधिनियम १९).

मुंबई वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९३८ (सन १९३८ चा मुंबई अधिनियम २६).

मुंबई उद्वाहक (लिफ्ट) अधिनियम, १९३९ (सन १९३९ चा मुंबई अधिनियम १०).

मुंबई महसूल न्यायाधिकरण अधिनियम, १९३९ (सन १९३९ चा मुंबई अधिनियम १२).

मुंबईचा शेतीच्या उत्पन्नाच्या बाजारांबाबत अधिनियम, १९३९ (सन १९३१ चा मुंबई अधिनियम २२).

मुंबई वैरण व धान्य नियंत्रण अधिनियम, १९३९ (सन १९३९ चा मुंबई अधिनियम २६).

मुंबई जमीन सुधारणा योजना अधिनियम, १९४२ (सन १९४२ चा मुंबई अधिनियम २८).

मुंबई कापूस नियंत्रण अधिनियम, १९४२ (सन १९४२ चा मुंबई अधिनियम ३०).

मुंबईचा मुद्रांक शुल्क वाढविण्याबाबत अधिनियम, १९४३ (सन १९४३ चा मुंबई अधिनियम १४).

मुंबईचा न्यायालय शुल्क वाढविण्याबाबत अधिनियम, १९४३ (सन १९४३ चा मुंबई अधिनियम १५).

मुंबईचा खाद्यधान्यांच्या पिकांची लागवड करण्याबाबत अधिनियम, १९४४ (सन १९४४ चा मुंबई अधिनियम ८).

मुंबईचा भिकाऱ्यांबाबत अधिनियम, १९४५ (सन १९४५ चा मुंबई अधिनियम २३).

मुंबई विक्री कर अधिनियम, १९४६ (सन १९४६ चा मुंबई अधिनियम ५).

मुंबई मोटर स्पिरिट विक्री कर अधिनियम, १९४६ (सन १९४६ चा मुंबई अधिनियम ६).

मुंबई विद्युतशक्ति (विशेष अधिकार) अधिनियम, १९४६ (सन १९४६ चा मुंबई अधिनियम २०).

मुंबई आवश्यक वस्तू व गुरेढोरे (नियंत्रण) अधिनियम, १९४६ (सन १९४६ चा मुंबई अधिनियम २२).

मुंबई हिंदू द्विविवाह प्रतिबंध अधिनियम, १९४६ (सन १९४६ चा मुंबई अधिनियम २५).

मुंबई कापूस (आकडेवारी) अधिनियम, १९४६ (सन १९४६ चा मुंबई अधिनियम २७).

मुंबई नगर-सेना अधिनियम, १९४७ (सन १९४७ चा मुंबई अधिनियम ३).

मुंबई सार्वजनिक सुरक्षिता उपाय योजना अधिनियम, १९४७ (सन १९४७ चा मुंबई अधिनियम ६).

मुंबई हरिजन सामाजिक अक्षमता दूर करण्यासंबंधी अधिनियम, १९४७ (सन १९४७ चा मुंबई अधिनियम १०).

मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम, १९४६ (सन १९४७ चा मुंबई अधिनियम ११).

मुंबई हिंदू घटस्फोट अधिनियम, १९४७ (सन १९४७ चा मुंबई अधिनियम २२).

मुंबईचा (निकडीचे प्रसंगी) फटके मारण्याचा अधिकार देण्याबाबत अधिनियम, १९४७ (सन १९४७ चा मुंबई अधिनियम २७).

मुंबई कर्जदार शेतकरी सहाय्य अधिनियम, १९४७ (सन १९४७ चा मुंबई अधिनियम २८).

मुंबई सावकार अधिनियम, १९४६ (सन १९४७ चा मुंबई अधिनियम ३१).

मुंबईचा निवाड्याची कामे (दुसऱ्या न्यायालयांकडे पाठविणे व चालू ठेवणे) यासंबंधी अधिनियम, १९४७ (सन १९४७ चा मुंबई अधिनियम ३४).

मुंबई हरिजन मंदिर प्रवेश अधिनियम, १९४७ (सन १९४७ चा मुंबई अधिनियम ३५).

मुंबई आवश्यक वस्तू पुरवठा (तात्पुरते अधिकार) आणि आवश्यक वस्तू व गुरेढोरे (नियंत्रण) (शास्तिवर्धन) अधिनियम, १९४७ (सन १९४७ चा मुंबई अधिनियम ३६).

मुंबईचा शेतांतील पिकांवरील कीड व रोग यांबाबत अधिनियम, १९४७ (सन १९४७ चा मुंबई अधिनियम ४३).

मुंबई अभ्यस्त अपराधी अधिनियम, १९४७ (सन १९४७ चा मुंबई अधिनियम ५१).

मुंबई वखार अधिनियम, १९४७ (सन १९४७ चा मुंबई अधिनियम ५६).

मुंबई भाडे नियंत्रण आणि पाथिकाश्रम व निवासगृह दर नियंत्रण अधिनियम, १९४७ (सन १९४७ चा मुंबई अधिनियम ५७).

मुंबई शिधापद्धति (पूर्वतयारी करणे व चालू ठेवणे) उपाययोजना अधिनियम, १९४७ (सन १९४७ चा मुंबई अधिनियम ५८).

मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९४७ (सन १९४७ चा मुंबई अधिनियम ६१).

मुंबईचा जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम, १९४७ (सन १९४७ चा मुंबई अधिनियम ६२).

मुंबई निर्वासित अधिनियम, १९४८ (सन १९४८ चा मुंबई अधिनियम २२).

मुंबईचा इमारती बांधणे, पुन्हा बांधणे व त्यांचे रूपांतर करणे यांवर नियंत्रण ठेवण्याबाबत अधिनियम, १९४८ (सन १९४८ चा मुंबई अधिनियम ३१).

मुंबई जमीन अधिग्रहण अधिनियम, १९४८ (सन १९४८ चा मुंबई अधिनियम ३३).

मुंबई माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा अधिनियम, १९४८ (सन १९४८ चा मुंबई अधिनियम ४९).

मुंबई सोडत (लॉटरी) व बक्षीस स्पर्धा नियंत्रण व कर अधिनियम, १९४८ (सन १९४८ चा मुंबई अधिनियम ५४).

मुंबईचा जनावरांच्या सांसर्गिक रोगांवर नियंत्रण ठेवण्याबाबत अधिनियम, १९४८ (सन १९४८ चा मुंबई अधिनियम ५९).

मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ (सन १९४८ चा मुंबई अधिनियम ६७).

मुंबई गृहनिर्माण मंडळ अधिनियम, १९४८ (सन १९४८ चा मुंबई अधिनियम ६९).

मुंबई बाल अधिनियम, १९४८ (सन १९४८ चा मुंबई अधिनियम ७१).

मुंबई खार जमीन अधिनियम, १९४८ (सन १९४८ चा मुंबई अधिनियम ७२).

मुंबई दुकाने व संस्था अधिनियम, १९४८ (सन १९४८ चा मुंबई अधिनियम ७९).

मुंबई प्राणीसंरक्षण अधिनियम, १९४८ (सन १९४८ चा मुंबई अधिनियम ८१).

मुंबई उसावरील उपकराबाबत अधिनियम, १९४८ (सन १९४८ चा मुंबई अधिनियम ८२).

मुंबई शरीररचनाशास्त्र अधिनियम, १९४९ (सन १९४९ चा मुंबई अधिनियम ११).

मुंबई शुश्रुषागृह नोंदणी अधिनियम, १९४९ (सन १९४९ चा मुंबई अधिनियम १५).

पोलीस दल (नियंत्रण व मार्गदर्शन) अधिनियम, १९४९ (सन १९४९ चा मुंबई अधिनियम १६).

मुंबई शिक्का अधिनियम, १९४९ (सन १९४९ चा मुंबई अधिनियम २२).

मुंबई दारुबंदी अधिनियम, १९४९ (सन १९४९ चा मुंबई अधिनियम २५).

मुंबईचा स्वदेशी परत पाठविलेल्या कैद्यांबाबत अधिनियम, १९४९ (सन १९४९ चा मुंबई अधिनियम २७).

## दुसरी अनुसूची

### भाग १

मुंबई हक्क प्रतिबंध अधिनियम, १८३९ (सन १८३९ चा अधिनियम २०).

व्याजाबाबत अधिनियम, १८३९ (सन १८३९ चा अधिनियम ३२).

भारताचा गुलामगिरी बाबत अधिनियम, १८४३ (सन १८४३ चा अधिनियम ५).

न्यायिक अधिकारी संरक्षण अधिनियम, १८५० (सन १८५० चा अधिनियम १८).

उमेदवार अधिनियम, १८५० (सन १८५० चा अधिनियम १९).

जाती अक्षमता दूर करण्यासंबंधी अधिनियम, १८५० (सन १८५० चा अधिनियम २१).

लोक सेवक (चौकशी) अधिनियम, १८५० (सन १८५० चा अधिनियम ३७).

वैध प्रतिनिधि दावे अधिनियम, १८५५ (सन १८५५ चा अधिनियम १२).

भारताचा प्राणघातक अपघातांबाबत अधिनियम, १८५५ (सन १८५५ चा अधिनियम १३).

हिंदू विधवा पुनर्विवाह अधिनियम, १८५६ (सन १८५६ चा अधिनियम १५).

जप्ती अधिनियम, १८५९ (सन १८५९ चा अधिनियम ९).

संस्था नोंदणी अधिनियम, १८६० (सन १८६० चा अधिनियम २१).

भारतीय दंड संहिता (सन १८६० चा अधिनियम ४५).

पोलीस अधिनियम (सन १८६१ चा अधिनियम ५).

विराम वाहने अधिनियम (सन १८६१ चा अधिनियम १६).

सरकारी शिक्का अधिनियम, १८६२ (सन १८६२ चा अधिनियम ३).

वाहक अधिनियम, १८६५ (सन १८६५ चा अधिनियम ३).

एतद्देशीय धर्मांतरित इसमांच्या विवाह विच्छेदाबाबत अधिनियम, १८६६ (सन १८६६ चा अधिनियम २१).

कार्यकारी न्यायाधीश अधिनियम, १८६७ (सन १८६७ चा अधिनियम १६).

मुद्रणालये व पुस्तके नोंदणी अधिनियम, १८६७ (सन १८६७ चा अधिनियम ४).

भारतीय घटस्फोट अधिनियम, १८६९ (सन १८६९ चा अधिनियम ४).

न्यायालय-शुल्क अधिनियम, १८७० (सन १८७० चा अधिनियम ७).

स्त्रीअर्भकहत्येस प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १८७० (सन १८७० चा अधिनियम ८).

गुरांच्या अतिक्रमणाबाबत अधिनियम, १८७१ (सन १८७१ चा अधिनियम १).

निवृत्तिवेतन अधिनियम, १८७१ (सन १८७१ चा अधिनियम २३).

भारतीय पुरावा अधिनियम, १८७२ (सन १८७२ चा अधिनियम १).

विशेष विवाह अधिनियम, १८७२ (सन १८७२ चा अधिनियम ३).

भारतीय करार अधिनियम, १८७२ (सन १८७२ चा अधिनियम ९).

भारताचा ख्रिश्चन लोकांच्या विवाहाबाबत अधिनियम, १८७२ (सन १८७२ चा अधिनियम १५).

भारताचा शपथांबाबत अधिनियम, १८७३ (सन १८७३ चा अधिनियम १०).

भारतीय वयस्कता अधिनियम १८७५ (सन १८७५ चा अधिनियम ९).

भारतीय विधि प्रतिवृत्त अधिनियम, १८७५ (सन १८७५ चा अधिनियम १८).

नाट्य प्रयोग अधिनियम, १८७६ (सन १८७६ चा अधिनियम १९)

विशिष्ट उपाय अधिनियम, १८७७ (सन १८७७ चा अधिनियम १).

भारतीय गुप्तनिधि अधिनियम, १८७८ (सन १८७८ चा अधिनियम ६).

विधिव्यवसायी अधिनियम, १८७९ (सन १८७९ चा अधिनियम १८).

धार्मिक संस्था अधिनियम, १८८० (सन १८८० चा अधिनियम १).

नगरपालिका कर अधिनियम, १८८१ (सन १८८१ चा अधिनियम ११).

भारतीय विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १८८२ (सन १८८२ चा अधिनियम २).

मालमत्ता हस्तांतरण अधिनियम, १८८२ (सन १८८२ चा अधिनियम ४).

भारताचा वहिवाटीच्या हक्कांबाबत अधिनियम, १८८२ (सन १८८२ चा अधिनियम ५).

मुखत्यारपत्र अधिनियम, १८८२ (सन १८८२ चा अधिनियम ७).

जमीन सुधारणाविषयक कर्जांबाबत अधिनियम, १८८३ (सन १८८३ चा अधिनियम १९).

शेतकरी कर्ज अधिनियम, १८८४ (सन १८८४ चा अधिनियम २).

जन्म, मृत्यू व विवाह नोंदणी अधिनियम, १८८६ (सन १८८६ चा अधिनियम ६).

भारतीय ट्रामवेज अधिनियम, १८८६ (सन १८८६ चा अधिनियम ११).

दाव्यांचे मूल्य ठरविण्याबाबत अधिनियम, १८८७ (सन १८८७ चा अधिनियम ७).

प्रांतिक लघुवाद न्यायालय अधिनियम, १८८७ (सन १८८७ चा अधिनियम ९).

पोलीस अधिनियम, १८८८ (सन १८८८ चा अधिनियम ३).

लांबी मोजण्याच्या मापांबाबत अधिनयम, १८८९ (सन १८८९ चा अधिनियम २).

महसूल वसुली अधिनियम, १८९० (सन १८९० चा अधिनियम १).

धर्मार्थ देणगी अधिनियम, १८९० (सन १८९० चा अधिनियम ६).

पालक व प्रतिपाल्य अधिनियम, १८९० (सन १८९० चा अधिनियम ८).

प्राण्यांस निर्दयतेने वागविण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १८९० (सन १८९० चा अधिनियम ११).

बँकरांची पुस्तके पुरावा अधिनियम, १८९१ (सन १८९१ चा अधिनियम १८).

खाजगी संपत्तीच्या सरकारी व्यवस्थेबाबत अधिनियम, १८९२ (सन १८९२ चा अधिनियम १०).

विभागणी अधिनियम, १८९३ (सन १८९३ चा अधिनियम ४).

भूमि संपादन अधिनियम, १८९४ (सन १८९४ चा अधिनियम १).

तुरुंगांबाबत अधिनियम, १८९४ (सन १८९४ चा अधिनियम ९).

बादशहा इनामे अधिनियम, १८९५ (सन १८९५ चा अधिनियम १५).

सांथीच्या रोगांबाबत अधिनियम, १८९७ (सन १८९७ चा अधिनियम ३).

भारताच्या मासेमारीबाबत अधिनियम, १८९७ (सन १८९७ चा अधिनियम ४).

सुधारणा विद्यालय अधिनियम, १८९७ (सन १८९७ चा अधिनियम ८).

सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १८९७ (सन १८९७ चा अधिनियम १०).

महारोगी अधिनियम, १८९८ (सन १८९८ चा अधिनियम ३).

दंड प्रक्रिया संहिता, १८९८ (सन १८९८ चा अधिनियम ५).

भारतीय डाकघर अधिनियम, १८९८ (सन १८९८ चा अधिनियम ६).

भारतीय मुद्रांक अधिनियम, १८९९ (सन १८९९ चा अधिनियम २).

सरकारी इमारती अधिनियम, १८९९ (सन १८९९ चा अधिनियम ४).

शेंबा (ग्लँडर्स) व गर (फार्सी) यांबाबत अधिनियम, १८९९ (सन १८९९ चा अधिनियम १३).

कैद्यांबाबत अधिनियम, १९०० (सन १९०० चा अधिनियम ३).

भारताचा परकीयांच्या विवाहाबाबत अधिनियम, १९०३ (सन १९०३ चा अधिनियम १४).

पुरातन स्मारक संरक्षण अधिनियम, १९०४ (सन १९०४ चा अधिनियम ७).

व्यवहार प्रक्रिया संहिता, १९०८ (सन १९०८ चा अधिनियम ५).

भारतीय मुदत अधिनियम, १९०८ (सन १९०८ चा अधिनियम ९).

दंड विधि (सुधारणा) अधिनियम, १९०८ (सन १९०८ चा अधिनियम १४).

भारतीय नोंदणी अधिनियम, १९०८ (सन १९०८ चा अधिनियम १६).

फटके मारण्याबाबत अधिनियम, १९०९ (सन १९०९ चा अधिनियम ४).

भारतीय विद्युतशक्ति अधिनियम, १९१० (सन १९१० चा अधिनियम ९).

राजद्रोहात्मक सभा प्रतिबंध अधिनियम, १९११ (सन १९११ चा अधिनियम १०).

भारताचा वेड लागलेल्या इसमांबाबत अधिनियम, १९१२ (सन १९१२ चा अधिनियम ४).

वन्य पक्षी व पशू संरक्षण अधिनियम, १९१२ (सन १९१२ चा अधिनियम ८).

अधिकृत विश्वस्त अधिनियम, १९१३ (सन १९१३ चा अधिनियम २).

महाप्रशासक अधिनियम, १९१३ (सन १९१३ चा अधिनियम ३).

मुसलमान वक्फ वैधकरण अधिनियम, १९१३ (सन १९१३ चा अधिनियम ६).

भारतीय कंपनी अधिनियम, १९१३ (सन १९१३ चा अधिनियम ७).

नाशकारक कीटक अधिनियम, १९१४ (सन १९१४ चा अधिनियम २).

स्थानिक प्राधिकाऱ्यांच्या कर्जाबाबत अधिनियम, १९१४ (सन १९१४ चा अधिनियम ९).

भारतीय वैद्यकीय पदवी अधिनियम, १९१६ (सन १९१६ चा अधिनियम ७).

हिंदूच्या मालमत्तेची विल्हेवाट लावण्याबाबत अधिनियम, १९१६ (सन १९१६ चा अधिनियम १५).

देशांतर्गत बाष्प जलयाने अधिनियम, १९१७ (सन १९१७ चा अधिनियम १).

कागदपत्र नष्ट करण्याबाबत अधिनियम, १९१७ (सन १९१७ चा अधिनियम ५).

चलचित्र अधिनियम, १९१८ (सन १९१८ चा अधिनियम २).

जबर व्याजाच्या कर्जांबाबत अधिनियम, १९१८ (सन १९१८ चा अधिनियम १०).

स्थानिक प्राधिकारी निवृत्तिवेतने व उपदाने अधिनियम, १९१९ (सन १९१९ चा अधिनियम १).

विषांबाबत अधिनियम, १९१९ (सन १९१९ चा अधिनियम १२).

प्रांतिक नादारी अधिनियम, १९२० (सन १९२० चा अधिनियम ५).

भारतीय तारणपत्र अधिनियम, १९२० (सन १९२० चा अधिनियम १०).

धर्मार्थ व धार्मिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९२० (सन १९२० चा अधिनियम १४).

भारतीय रेडक्रॉस सोसायटी अधिनियम, १९२० (सन १९२० चा अधिनियम १५).

कैद्यांची ओळख पटविण्याबाबत अधिनियम, १९२० (सन १९२० चा अधिनियम २३).

भारतीय निर्वाचन अपराध व चौकशी अधिनियम, १९२० (सन १९२० चा अधिनियम ३९).

कापूस परिवहन अधिनियम, १९२३ (सन १९२३ चा अधिनियम ३).

भारतीय बाष्पयंत्र अधिनियम, १९२३ (सन १९२३ चा अधिनियम ५).

कामगारांना नुकसानभरपाई देण्याबाबत अधिनियम, १९२३ (सन १९२३ चा अधिनियम ८).

भारताचा सरकारी गुप्तगोष्टींबाबत अधिनियम, १९२३ (सन १९२३ चा अधिनियम १९).

विधि व्यवसायी (स्त्रिया) अधिनियम, १९२३ (सन १९२३ चा अधिनियम २३).

मुसलमान वक्फ अधिनियम, १९२३ (सन १९२३ चा अधिनियम ४२).

कापसांतील सरकी काढण्याच्या व कापसाचे गठ्ठे बांधण्याच्या कारखान्यांबाबत अधिनियम, १९२५ (सन १९२५ चा अधिनियम १२).

भविष्यनिधी अधिनियम, १९२५ (सन १९२५ चा अधिनियम १९).

भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५ (सन १९२५ चा अधिनियम ३९).

न्यायालय अवमान अधिनियम, १९२६ (सन १९२६ चा अधिनियम १२).

भारतीय कामगार संघ अधिनियम, १९२६ (सन १९२६ चा अधिनियम १६).

कापूस उद्योग (आकडेवारी) अधिनियम, १९२६ (सन १९२६ चा अधिनियम २०).

विधि व्यवसायी (फी) अधिनियम, १९२६ (सन १९२६ चा अधिनियम २१).

भारताचा जंगलाबाबत अधिनियम, १९२७ (सन १९२७ चा अधिनियम १६).

हिंदू वारसा (असमर्थता दूर करण्यासंबंधी) अधिनियम, १९२८ (सन १९२८ चा अधिनियम १२).

हिंदू वारसा विधि (सुधारणा) अधिनियम, १९२९ (सन १९२९ चा अधिनियम २).

बालविवाह प्रतिबंध अधिनियम, १९२९ (सन १९२९ चा अधिनियम १९).

अपायकारक औषधिद्रव्यांबाबत अधिनियम, १९३० (सन १९३० चा अधिनियम २).

भारताचा मालाच्या विक्रीबाबत अधिनियम, १९३० (सन १९३० चा अधिनियम ३).

हिंदू विद्याधन अधिनियम, १९३० (सन १९३० चा अधिनियम ३०).

मुसलमान वक्फ वैधकरण अधिनियम, १९३० (सन १९३० चा अधिनियम २२).

भारतीय मुद्रणालय (आकस्मिक प्रसंगी चालवावयाचे अधिकार) अधिनियम, १९३१ (सन १९३१ चा अधिनियम २३).

भारतीय भागीदारी अधिनियम, १९३२ (सन १९३२ चा अधिनियम ९).

दंड विधि सुधारणा अधिनियम, १९३२ (सन १९३२ चा अधिनियम २३).

मुलांच्या मजुरीबद्दल बांधून घेण्याबाबत अधिनियम, १९३३ (सन १९३३ चा अधिनियम २).

भारतीय वैद्यक परिषद अधिनियम, १९३३ (सन १९३३ चा अधिनियम २७).

ऊस अधिनियम, १९३४ (सन १९३४ चा अधिनियम १५).

पारशी विवाह व घटस्फोट अधिनियम, १९३६ (सन १९३६ चा अधिनियम ३).

वेतन देण्याबाबत अधिनियम, १९३६ (सन १९३६ चा अधिनियम ४).

शेतीच्या उत्पन्नाबाबत (प्रत लावणे व निशाणी करणे यासंबंधी) अधिनियम, १९३७ (सन १९३७ चा अधिनियम १).

हिंदू स्त्रियांच्या मालमत्तेवरील हक्काबाबत अधिनियम, १९३७ (सन १९३७ चा अधिनियम १८).

आर्य विवाह वैधकरण अधिनियम, १९३७ (सन १९३७ चा अधिनियम १९).

मुसलमान वैयक्तिक विधि (शरियत) लागू करण्याबाबत अधिनियम, १९३७ (सन १९३७ चा अधिनियम २६).

कच्छी मेमणांबाबत अधिनियम, १९३८ (सन १९३८ चा अधिनियम १०).

दंड विधि सुधारणा अधिनियम, १९३८ (सन १९३८ चा अधिनियम २०).

मालकांच्या जबाबदारीबाबत अधिनियम, १९३८ (सन १९३८ चा अधिनियम २४).

मुलांना कामावर लावण्याबाबत अधिनियम, १९३८ (सन १९३८ चा अधिनियम २६).

मोटार वाहन अधिनियम, १९३९ (सन १९३९ चा अधिनियम ४).

मुसलमान विवाहविच्छेद अधिनियम, १९३९ (सन १९३९ चा अधिनियम ८).

व्यापारी दस्तऐवज पुरावा अधिनियम, १९३९ (सन १९३९ चा अधिनियम १६).

वैद्यकीय पदवीपत्रे अधिनियम, १९३९ (सन १९३९ चा अधिनियम २८).

लवादी अधिनियम, १९४० (सन १९४० चा अधिनियम १०).

औषधिद्रव्यांबाबत अधिनियम, १९४० (सन १९४० चा अधिनियम २३).

व्यवसाय कर मर्यादा अधिनियम, १९४१ (सन १९४१ चा अधिनियम २०).

साप्ताहिक सुट्ट्यांबाबत अधिनियम, १९४२ (सन १९४२ चा अधिनियम १८).

उद्योगधंद्यांच्या आकडेवारीबाबत अधिनियम, १९४२ (सन १९४२ चा अधिनियम १९).

हिंदू स्त्रियांच्या स्वतंत्र राहण्यासंबंधी व पोटगीसंबंधी हक्काबाबत अधिनियम, १९४६ (सन १९४६ चा अधिनियम १९).

उद्योगधंद्यातील नोकरीबाबत (स्थायी आदेशांसंबंधी) अधिनियम, १९४६ (सन १९४६ चा अधिनियम २०).

हिंदुची विवाहविषयक असमर्थता दूर करण्यासंबंधी अधिनियम, १९४६ (सन १९४६ चा अधिनियम २८).

आवश्यक पुरवठा (तात्पुरते अधिकार) अधिनियम, १९४६ (सन १९४६ चा अधिनियम २४).

लांचलुचपत प्रतिबंध अधिनियम, १९४७ (सन १९४७ चा अधिनियम २).

औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ (सन १९४७ चा अधिनियम १४).

अधिग्रहण केलेल्या जमिनीसंबंधी (अधिकार चालू ठेवण्याबाबत) अधिनियम, १९४७ (सन १९४७ चा अधिनियम १७).

भारतीय परिचारिका परिषद अधिनियम, १९४७ (सन १९४७ चा अधिनियम ४३).

औषधशाला अधिनियम, १९४८ (सन १९४८ चा अधिनियम ८).

किमान वेतन अधिनियम, १९४८ (सन १९४८ चा अधिनियम ११).

पुनर्वसन अर्थसाहाय्य प्रशासन अधिनियम, १९४८ (सन १९४८ चा अधिनियम १२).

दंतवैद्य अधिनियम, १९४८ (सन १९४८ चा अधिनियम १६).

निर्वासित इसम (दावे दाखल करण्यासंबंधी) अधिनियम, १९४८ (सन १९४८ चा अधिनियम ४७).

विद्युतशक्ति (पुरवठा) अधिनियम, १९४८ (सन १९४८ चा अधिनियम ५४).

कारखाने अधिनियम, १९४८ (सन १९४८ चा अधिनियम ६३).

हिंदू विवाह वैधता अधिनियम, १९४९ (सन १९४९ चा अधिनियम २१).

कर देण्यासंबंधी (मालमत्ता हस्तांतरण) अधिनियम, १९४९ (सन १९४९ चा अधिनियम २२).

निर्वासित इसम (वैधरीत्या चालू केलेली कामे) अधिनियम, १९४९ (सन १९४९ चा अधिनियम २५).

आवश्यक सेवा (चालू ठेवण्यासंबंधी) अध्यादेश, १९४१ (सन १९४१ चा अध्यादेश ११).

**भाग २**

मुंबई वित्त अधिनियम, १९३२ (सन १९३२ चा मुंबई अधिनियम २).

## तिसरी अनुसूची

| अधिनियम<br>(१) | संस्थानांची नावे<br>(२) | सुधारणा<br>(३) |
| --- | --- | --- |
| मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ (सन १९४८ चा मुंबई अधिनियम ६७). | अक्कलकोट, औंध, भोर, जमखंडी, जत, कुरुंदवाड (मोठी पाती), कुरुंदवाड (धाकटी पाती), मिरज (मोठी पाती), मिरज (धाकटी पाती), मुधोळ, फलटण, रामदुर्ग, सांगली, सावनूर, सावंतवाडी, वाडी जागीर, जंजिरे, धरमपूर, वाडासिनोर, छोटा-उदेपूर, लुणावाडा, राजपिपळा (सेगबारा धरून), बारिया, बांसदा, संत, खंबायत, इडार, जव्हार, विजयनगर, सांचीन, राधनपूर, पालनपूर जंबुधोडा, सुरगणा, थराड, भादेखा, मोहनपूर, मालपूर, माणसा, वाव, खडाल, घोडासर, वासणा, कटोसण, सूदासणा, वालासणा, राणासन, वार्सोडा, अंबालिआरा, पुनाद्रा, झालोल, संजेली. | अधिनियमास जोडलेल्या अनुसूचीच्या ४ थ्या आसनांत —<br>(अ) त्यात उल्लेख केलेला मुंबई कुळवहिवाट अधिनियम यांचे कलम ३ अ यात " तारीख ८ माहे नोव्हेंबर सन १९४७ " या शब्दांच्या व आकड्यांच्या ऐवजी " तारीख ११ माहे ऑगस्ट सन १९४९ " हे शब्द व आकडे दाखल करावे.<br>(ब) त्यात उल्लेख केलेला मुंबई कुळवहिवाट अधिनियम याचे कलम ४, पोट-कलम (१) याच्या परंतुकांत " मुंबईचा लहान खातेदारांस साहाय्य देण्याबाबत अधिनियम, १९३८, याचे कलम ९ यासंबंधीचा उल्लेख हा मुंबईचा लहान खातेदारांस साहाय्य देण्याबाबत अधिनियम, १९३८, याचे कलम ९ यासारखा उक्त कोणत्याही संस्थानांत असलेला कोणताही अधिनियम " असा उल्लेख आहे असे समजून त्याप्रमाणे तो वाचण्यांत यावा.<br>(क) त्यात उल्लेख केलेला मुंबई कुळवहिवाट अधिनियम, कलम ४, पोट-कलम (१) याच्या परंतुकांत " तारीख ८ माहे नोव्हेंबर सन १९४६ " या शब्दांच्या व आकड्यांच्या ऐवजी " तारीख ८ माहे ऑगस्ट सन १९४८ " हे शब्द व आकडे दाखल करावे.<br>(ड) त्यात उल्लेख केलेला मुंबई कुळवहिवाट अधिनियम याचे कलम ४, पोट-कलम (२) यांत—<br>(१) " तारीख ८ माहे नोव्हेंबर सन १९४६ " या शब्दांच्या व आकड्यांच्या ऐवजी " तारीख ११ माहे ऑगस्ट सन १९४८ " हे शब्द व आकडे दाखल करावे. |

मुंबई कुळवहिवाट व शेत जमीन अधिनियम, १९४८ (सन १९४८ चा मुंबई अधिनियम ६७) | कोल्हापूर | ... | ... | ...

(२) उप-कंडिका (ब) (१) मधील " तारीख ३१ माहे मे सन १९४७ " या शब्दांच्या वा आकड्यांच्या ऐवजी " तारीख ३१ माहे मे सन १९४९ " हे शब्द व आकडे दाखल करावे.

(३) उप-कंडिका (ब) (२) मधील " तारीख १ माहे जून सन १९४७ " या शब्दांच्या व आकडयांच्या ऐवजी " तारीख १ माहे जून १९४९ " हे शब्द व आकडे दाखल करावे.

अधिनियमास जोडलेल्या अनुसूचीच्या ४ थ्या आसनांत —

(अ) त्यांत उल्लेख केलेला मुंबई कुळवहिवाट अधिनियम, कलम ३-अ यांत "तारीख ८ माहे नोव्हेंबर सन १९४७" या शब्दांच्या व आकड्यांच्या ऐवजी "तारीख १ माहे मे सन १९५०" हे शब्द व आकडे दाखल करावे.

(ब) त्यांत उल्लेख केलेला मुंबई कुळवहिवाट अधिनियम याचे कलम ४, पोट-कलम (१) याच्या परंतुकांत, "मुंबईचा लहान खातेदारांस साहाय्य देण्याबाबत अधिनियम, १९३८, याचे कलम ९ या संबंधींचा उल्लेख हा मुंबईचा लहान खातेदारांस साहाय्य देण्याबाबत अधिनियम, १९३८, याचे कलम ९ यासारखा उक्त संस्थांनात असलेला कोणताही अधिनियम" असा उल्लेख आहे असे समजून त्याप्रमाणे तो वाचण्यांत यावा.

(क) त्यांत उल्लेख केलेला मुंबई कुळवहिवाट अधिनियम याचे कलम ४, पोट-कलम (१) याच्या परंतुकांत "तारीख ८ माहे नोव्हेंबर सन १९४६" या शब्दांच्या व आकड्यांच्या ऐवजी "तारीख १ माहे मे सन १९४९" हे शब्द व आकडे दाखल करावे.

(ड) त्यांत उल्लेख केलेला मुंबई कुळवहिवाट अधिनियम यांचे कलम ४, पोट-कलम (२) यांत—

(१) "तारीख ८ माहे नोव्हेंबर सन १९४६" या शब्दांच्या व आकड्यांच्या ऐवजी "तारीख १ माहे मे सन १९४९" हे शब्द व आकडे दाखल करावे ;

| अधिनियम<br>(१) | संस्थानांची नावे<br>(२) | सुधारणा<br>(३) |
|---|---|---|
| | | (२) उप-कंडिका (ब) (१) मधील "तारीख ३१ माहे मे सन १९४७" या शब्दांच्या व आकड्यांच्या ऐवजी "तारीख ३१ माहे मे सन १९४९" हे शब्द व आकडे दाखल करावे ;<br>(३) उप-कंडिका (ब) (२) मधील "तारीख १ माहे जून सन १९४७" या शब्दांच्या व आकड्यांच्या ऐवजी "तारीख १ माहे जून सन १९४९" हे शब्द व आकडे दाखल करावे. |
| मुंबई कर्जदार शेतकरी साहाय्य अधिनियम, १९४७ (सन १९४७ चा मुंबई अधिनियम २८). | अक्कलकोट, औंध, भोर, जमखंडी, जत, कुरुंदवाड (मोठी पाती), कुरुंदवाड (धाकटी पाती), मिरज (मोठी पाती), मिरज (धाकटी पाती), मुधोळ, फलटण, रामदुर्ग, सांगली, सावतूर, सावंतवाडी, वाडी जागीर, जंजिरे, धरमपूर, वाडासिनोर, छोटा-उदेपूर, लुणावाडा, राजपिपळा (सेगबारा धरून), बारिया, बांसदा, संत, खंबायत, इडार, जव्हार, विजयनगर, सांचीन, राधनपूर, पालनपूर जंबुघोडा, सुरगणा, थरत, भादेरवा, मोहनपूर, मालपूर, माणसा, वाव, खडाल, घोडासार, वासणा, कटोसण, सूदासणा, वालसणा, राणासन, वर्सोडा, अंबालिभारा, पुनाद्रा, इलोल, स्तंजेली. | (१) कलम २ मध्ये—<br>(अ) (१) कंडिका (२) मध्ये " सहकारी संस्था " या संज्ञेचा अर्थ मुंबई सहकारी संस्था अधिनियम, १९२५, यांतील उपबंधासारख्या कोणत्याही उपबंधांअन्वये नोंदलेली संस्था किंवा उक्त अधिनियमान्वये नोंदलेली संस्था असा समजावा.<br>(२) कंडिका (५) मध्ये (अ) " तारीख ३० माहे जानेवारी सन १९४० " हे शब्द व आकडे जेथे जेथे येतात तेथे तेथे त्यांच्या ऐवजी " तारीख १ माहे जानेवारी सन १९४८ " हे शब्द व आकडे दाखल करावे.<br>(ब) " हा अधिनियम अंमलात येण्याच्या किंवा रद्द केलेल्या अधिनियमान्वये संबंधित मंडळ स्थापन झाल्याच्या तारखेच्या " हे शब्द जेथे जेथे येतात तेथे तेथे त्यांच्या ऐवजी " तारीख १५ माहे सप्टेंबर सन १९४८ च्या " हे शब्द व आकडे दाखल करावे.<br>(२) कलम ४ मध्ये पोट-कलम (१) ऐवजी पुढील पोट-कलम दाखल करावे.—<br>(१) " कोणत्याही स्थानिक क्षेत्रात सामान्यतः वास्तव्य करणाऱ्या कोणत्याही कर्जदारास किंवा त्याच्या धनकोस न्यायालयाकडे त्याच्या कर्जांची तोडजोड करण्यासाठी तारीख १५ माहे जून सन १९४९ रोजी किंवा त्यापूर्वी अर्ज करण्याचा अधिकार आहे ". |

(३) कलम ७ मध्ये, “ तारीख १ माहे जानेवारी सन १९३८ ” या शब्दांच्या व आकड्यांच्या ऐवजी “ तारीख १ माहे जानेवारी सन १९४८ ” हे शब्द व आकडे दाखल करावे.

(४) कलम २२ मध्ये आणखी पुढील परंतुक दाखल करावे—

“ तसेच, शेतकऱ्यांच्या कर्जांची तोडजोड किंवा तडजोड करण्यासंबंधी ह्या अधिनियमासारखा जो कोणताही विधि उक्त संस्थानांपैकी कोणत्याही संस्थानात अंमलात असेल त्याअन्वये सक्षम न्यायाधिकरणाने किंवा प्राधिकाऱ्याने धनकोस येणे असलेली कोणतीही रक्कम ठरविली असेल तेव्हा, अशा रीतीने ठरविलेली रक्कम सर्व पक्षास बंधनकारक राहील ”.

(५) कलम २३ मध्ये, परंतुकात, “ १८७९ ” या आकड्यांच्या नंतर “ किंवा त्यासारखा कोणताही अधिनियम ” हे शब्द दाखल करावे.

(६) कलम २४, पोट-कलम (२) यात “ तारीख १ माहे ऑगस्ट सन १९४७ ” या शब्दांच्या व आकड्यांच्या ऐवजी “ तारीख १६ माहे जून सन १९४९ ” हे शब्द व आकडे दाखल करावे.



(७) कलम २५ मध्ये,—

(अ) कंडिका (१) मध्ये, “ किंवा रद्द केलेल्या अधिनियमाचे कलम ४ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या मंडळाने ” हे शब्द गाळण्यात यावे.

(ब) कंडिका (२) मध्ये, “ तारीख १५ माहे फेब्रुवारी सन १९३९ ” या शब्दांच्या व आकड्यांच्या ऐवजी “ तारीख १ माहे जानेवारी सन १९४८ ” हे शब्द व आकडे दाखल करावे.

(८) कलम ३२, पोट-कलम (२) मध्ये,—

(१) कंडिका (क) ऐवजी पुढील कंडिका दाखल करावी—

“ (क) साधन संस्थांनी किंवा कलम ५४ अन्वये कर्ज देण्यास अधिकृत केलेल्या इसमांनी पिकांसाठी पैसा पुरविण्याकरिता किंवा हंगामी पैसा पुरविण्याकरिता दिलेली कर्जे ”;

**तिसरी अनुसूची**—(चालू)

| अधिनियम | संस्थानांची नावे | सुधारणा |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | (२) स्पष्टीकरणात, “ रद्द केलेल्या अधिनियमान्वये ”आणि “ ह्या अधिनियमान्वये ” हे शब्द गाळण्यात यावे. |
| | | (९) कलम ५६ मध्ये, “ हा अधिनियम अंमलात आल्याच्या तारखेस ” या शब्दांच्या वा आकड्यांच्याऐवजी “ तारीख १५ माहे जून सन १९४९ रोजी ” हे शब्द व आकडे दाखल करावे आणि “ दक्षिणेतील शेतकऱ्यांस साहाय्य देण्याबाबत अधिनियम, १८७९ ” या शब्दांच्या व आकड्यांच्याऐवजी “ दक्षिणेतील शेतकऱ्यांस साहाय्य देण्याबाबत अधिनियम, १८७९, यासारखा कोणत्याही संस्थानांत अंमलात असलेला कोणताही अधिनियम ” हे शब्द व आकडे दाखल करावे. |
| | | (१०) कलम ५६, पोट-कलम (१) मध्ये— |
| | | (१) “ दक्षिणेतील शेतकऱ्यांस साहाय्य देण्याबाबत अधिनियम, १८७९, हा मुंबई कर्जदार शेतकरी साहाय्य अधिनियम, १९३९, याअन्वये रद्द करण्यात आला असला तरी, प्रथमनिर्दिष्ट अधिनियम हा ” या शब्दांच्या व आकड्यांच्याऐवजी “ दक्षिणेतील शेतकऱ्यांस साहाय्य देण्याबाबत अधिनियम, १८७९, या सारखा कोणत्याही संस्थानात अंमलात असलेला कोणताही अधिनियम रद्द करण्यात आला असला तरी, असा अधिनियम हा ” हे शब्द व आकडे दाखल करावे ; |
| | | (२) “ प्रस्तुत अधिनियम अंमलात आल्याच्या तारखेपासून (जिचा उल्लेख ह्या कलमात यापुढे उक्त तारीख म्हणून केला आहे) ” हे शब्द व कंस गाळण्यात यावे ; |
| | | (३) “ उक्त तारखेपासून तीन वर्षांच्या मुदतीपर्यंत ” या शब्दांच्याऐवजी “ तारीख २६ माहे मे सन १९५० पर्यंत ” हे शब्द व आकडे दाखल करावे ; |

| | | |
|---|---|---|
| | | (४) पहिल्या परंतुकाऐवजी पुढील परंतुक दाखल करावे— <br> " परंतु, तारीख २६ माहे मे सन १९५० रोजी किंवा त्यापूर्वी कोणत्याही दाव्यातील किंवा दाव्यातून उद्भवणारे कोणतेही काम हे, उक्त तारखेनंतर, जणू दक्षिणेतील शेतकऱ्यांस साहाय्य देण्याबाबत अधिनियम, १८७९, यासारखा अधिनियम उक्त तारखेनंतर अंमलात असण्याचे चालू होते असे समजून चालू ठेवून निकालात काढले पाहिजे ". |
| मुंबई कर्जदार शेतकरी साहाय्य अधिनियम, १९४७ (सन १९४७ चा मुंबई अधिनियम २८). | कोल्हापूर . . . . . . . . . | (१) कलम २ मध्ये,— <br> (१) कंडिका (२) मध्ये " सहकारी संस्था " या संज्ञेचा अर्थ मुंबई सहकारी संस्था अधिनियम, १९२५, यातील उपबंधांसारख्या कोणत्याही उपबंधांन्वये नोंदलेली संस्था किंवा उक्त अधिनियमान्वये नोंदलेली संस्था असा समजावा ; <br> (२) कंडिका (५) मध्ये— <br> (अ) " तारीख ३० माहे जानेवारी सन १९४० " हे शब्द व आकडे जेथे जेथे येतात तेथे तेथे त्यांच्याऐवजी " तारीख १ माहे जानेवारी सन १९४९ च्या " हे शब्द व आकडे दाखल करावे. <br> (ब) " हा अधिनियम अंमलात येण्याच्या किंवा रद्द केलेल्या अधिनियमाअन्वये संबंधित मंडळ स्थापन झाल्याच्या तारखेच्या " हे शब्द जेथे जेथे येतात तेथे तेथे " तारीख १५ माहे सप्टेंबर सन १९४९ " हे शब्द व आकडे दाखल करावे. <br> (२) कलम ४ मध्ये, पोट-कलम (१) च्या ऐवजी पुढील पोट-कलम दाखल करावे :— <br> " (१) कोणत्याही स्थानिक क्षेत्रात सामान्यतः वास्तव्य करणाऱ्या कोणत्याही कर्जदारास किंवा त्याच्या धनकोस न्यायालयाकडे त्याच्या कर्जाची तडजोड करण्यासाठी तारीख ३१ माहे ऑक्टोबर सन १९४९ पूर्वी अर्ज करण्याचा अधिकार आहे : <br> परंतु, रत्नागिरी जिल्ह्याच्या राजापूर तालुक्याचा भाग बनलेल्या मोसोशी, सोळिवडे, आंगळे व मोसम या गावांपैकी कोणत्याही गावात सामान्यतः वास्तव्य |

| अधिनियम<br>(१) | संस्थानांची नावे<br>(२) | सुधारणा<br>(३) |
|---|---|---|
| | | करणाऱ्या कोणत्याही कर्जदारास किंवा अशा कर्जदाराच्या कोणत्याही धनकोस न्यायालयाकडे त्याच्या कर्जांची तोडजोड करण्यासाठी तारीख ३१ माहे ऑगस्ट सन १९५० रोजी किंवा त्यापूर्वी अर्ज करण्याचा अधिकार आहे. ”.<br>(३) कलम ७ मध्ये “ तारीख १ माहे जानेवारी सन १९३८ ” या शब्दांच्या व आकड्यांच्या ऐवजी “ तारीख १ माहे जानेवारी सन १९४९ ” हे शब्द व आकडे दाखल करावे.<br>(४) कलम २२ मध्ये आणखी पुढील परंतुक दाखल करावे :—<br>“ तसेच, शेतकऱ्यांच्या कर्जांची तडजोड किंवा तोडजोड करण्यासंबंधी ह्या अधिनियमासारखा जो कोणताही विधि कोल्हापूर संस्थानांत अंमलात असेल त्याअन्वये सक्षम न्यायाधिकरणाने किंवा प्राधिकाऱ्याने धनकोस येणे असलेली कोणतीही रक्कम ठरविली असेल तेव्हा, अशा रीतीने ठरविलेली रक्कम सर्व पक्षांस बंधनकारक राहील ”.<br>(५) कलम २३ मध्ये, “ १८७९ ” या आकड्याच्या नंतर “ किंवा त्यासारखा कोणताही अधिनियम ” हे शब्द दाखल करावे.<br>(६) कलम २४ मध्ये, पोट-कलम (२) मध्ये,—<br>(१) “ तारीख १ माहे ऑगस्ट सन १९४७ ” या शब्दांच्या व आकड्यांच्या ऐवजी “ तारीख ३१ माहे ऑक्टोबर सन १९४९ ” हे शब्द व आकडे दाखल करावे.<br>(२) “ तारीख १ माहे ऑगस्ट सन १९४७ पूर्वी करण्याचा अधिकार आहे ” या मजकुरानंतर पुढील परंतुक दाखल करावे :—<br>“ परंतु रत्नागिरीच्या राजापूर तालुक्याचा भाग बनलेल्या मोसोशी, सोळिवडे, आंगळे व मोसम या गावांपैकी कोणत्याही गावांत सामान्यतः वास्तव्य |

करणाऱ्या कोणत्याही शेत मजुरास असा अर्ज तारीख ३१ माहे ऑगस्ट सन १९५० रोजी किंवा त्यापूर्वी करण्याचा अधिकार आहे ".

(३) " अर्जाची सुनावणी केल्यावर " या शब्दांच्या पूर्वी " (३) " हे कंस व आकडा दाखल करावा.

(७) कलम २५ मध्ये—

(१) कंडिका (१) मध्ये " किंवा रद्द केलेल्या अधिनियमाचे कलम ४ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या मंडळाने " हे शब्द गाळण्यात यावे.

(२) कंडिका (२) मध्ये " तारीख १५ माहे फेब्रुवारी सन १९३९ " या शब्दांच्या व आकड्यांच्या ऐवजी " तारीख १ माहे जानेवारी सन १९४९ " हे शब्द व आकडे दाखल करावे.

(८) कलम ३२, पोट-कलम (२) मध्ये—

(१) कंडिका (क) ऐवजी पुढील कंडिका दाखल करावी :—

" (क) साधन संस्थांनी किंवा कलम ५४ अन्वये कर्ज देण्यास अधिकृत केलेल्या इसमांनी पिकांसाठी पैसा पुरविण्याकरिता किंवा हंगामी पैसा पुरविण्याकरिता दिलेली कर्जे " ;

(२) स्पष्टीकरणात, " रद्द केलेल्या अधिनियमाअन्वये " आणि " ह्या अधिनियमाअन्वये " हे शब्द गाळण्यात यावे.

(९) कलम ५६, पोट-कलम (१) मध्ये—

(१) " दक्षिणेतील शेतकऱ्यास साहाय्य देण्याबाबत अधिनियम, १८७९, मुंबई कर्जदार शेतकरी साहाय्य अधिनियम, १९३९, याअन्वये रद्द करण्यात आला असला तरी, प्रथमनिर्दिष्ट अधिनियम हा " या शब्दांच्या व आकड्यांच्या ऐवजी " दक्षिणेतील शेतकऱ्यांस साहाय्य देण्याबाबत अधिनियम, १८७९ यासारखा कोल्हापूर संस्थानात अंमलात असलेला कोणत्याही अधिनियम रद्द करण्यात आला असला तरी, असा अधिनियम हा " हे शब्द व आकडे दाखल करावे ;

## **तिसरी अनुसूची**—(चालू)

| अधिनियम (१) | संस्थानांची नावे (२) | सुधारणा (३) |
| --- | --- | --- |
| | | (२) " प्रस्तुत अधिनियम अंमलात आल्याच्या तारखेपासून (जिचा उल्लेख ह्या कलमात यापुढे उक्त तारीख म्हणून केला आहे) " हे शब्द व कंस गाळण्यात यावे ; <br> (३) " उक्त तारखेपासून तीन वर्षांच्या मुदतीपर्यंत " या शब्दांच्या ऐवजी " तारीख २६ माहे मे सन १९५० पर्यंत " हे शब्द व आकडे दाखल करावे ; <br> (४) पहिल्या परंतुकाच्या ऐवजी पुढील परंतुक दाखल करावे :— <br> " परंतु तारीख २६ माहे मे सन १९५० रोजी किंवा त्यापूर्वी कोणत्याही दाव्यातील किंवा दाव्यातून उद्भवणारे कोणतेही काम हे उक्त तारखेनंतर, जणू दक्षिणेतील शेतकऱ्यास साहाय्य देण्याबाबत अधिनियम उक्त तारखेनंतर अंमलात असण्याचे चालू होते असे समजून, चालू ठेवून निकालात काढले पाहिजे. ". |
| मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ (सन १९४८ चा मुंबई अधिनियम ६७). | बडोदे व दाता ... ... ... | अधिनियमास जोडलेल्या अनुसूचीच्या ४ थ्या आसनात :— <br> (अ) त्यात उल्लेख केलेला मुंबई कुळवहिवाट अधिनियम याचे कलम ३-अ यात " तारीख ८ माहे नोव्हेंबर सन १९४७ " या शब्दांच्या व आकड्यांच्या ऐवजी " तारीख १ माहे ऑगस्ट सन १९५० " हे शब्द व आकडे दाखल करावे. <br> (ब) त्यात उल्लेख केलेला मुंबई कुळवहिवाट अधिनियम याचे कलम ४, पोट-कलम (१) च्या परंतुकात " मुंबईच्या लहान खातेदारांस साहाय्य देण्याबाबत अधिनियम, १९२८, याचे कलम ९ " यासंबंधीचा उल्लेख हा " मुंबईचा लहान खातेदारास साहाय्य देण्याबाबत अधिनियम याचे कलम ९ यासारखा उक्त संस्थानात असलेला कोणताही अधिनियम " असा उल्लेख आहे असे समजून तो वाचण्यात यावा. |

(क) त्यात उल्लेख केलेला मुंबई कुळवहिवाट अधिनियम, कलम ४, पोट-कलम (१) याच्या परंतुकात " तारीख ८ माहे नोव्हेंबर सन १९४६ " या शब्दांच्या व आकड्यांच्या ऐवजी " तारीख १ माहे ऑगस्ट सन १९५० " हे शब्द व आकडे दाखल करावे.

(ड) त्यात उल्लेख केलेला मुंबई कुळवहिवाट अधिनियम, याचे कलम ४, पोट-कलम (२) यात—

(१) " तारीख ८ माहे नोव्हेंबर सन १९४६ " या शब्दांच्या व आकड्यांच्या ऐवजी " तारीख १ माहे ऑगस्ट सन १९४९ " हे शब्द व आकडे दाखल करावे.

(२) उप-कंडिका (ब) (१) मधील " तारीख ३१ माहे मे सन १९४७ " या शब्दांच्या व आकड्यांच्या ऐवजी " तारीख ३१ माहे मे सन १९५० " हे शब्द व आकडे दाखल करावे.



(३) उप-कंडिका (ब) (२) मधील " तारीख १ माहे जून सन १९४७ " या शब्दांच्या व आकड्यांच्या ऐवजी " तारीख १ माहे जून सन १९५० " हे शब्द व आकडे दाखल करावे.

मुंबई कर्जदार शेतकरी साहाय्य अधिनियम, १९४७ (सन १९४७ चा मुंबई अधिनियम २८). . . . . . . . . . . . . (१) कलम २ मध्ये—

(१) कंडिका (२) मध्ये " सहकारी संस्था " या संज्ञेचा अर्थ मुंबई सहकारी संस्था अधिनियम, १९२५, यातील उपबंधासारख्या कोणत्याही उपबंधाअन्वये नोंदलेली संस्था किंवा उक्त अधिनियमाअन्वये नोंदलेली संस्था असा समजावा ;

(२) कंडिका ५ मध्ये—

(अ) " तारीख ३० माहे जानेवारी सन १९४० " हे शब्द व आकडे जेथे जेथे येतात तेथे तेथे त्यांच्याऐवजी " तारीख १ माहे जानेवारी सन १९४९ " हे शब्द व आकडे दाखल करावे.

**तिसरी अनुसूची**—(चालू)

| अधिनियम | संस्थानांची नावे | सुधारणा |
| --- | --- | --- |
| (१) | (२) | (३) |

(ब) “ हा अधिनियम अंमलात येण्याच्या किंवा रद्द केलेल्या अधिनियमाअन्वये संबंधित मंडळ स्थापन झाल्याच्या तारखेच्या ” हे शब्द व आकडे जेथे जेथे येतात तेथे तेथे त्यांच्याऐवजी “ तारीख १५ माहे सप्टेंबर सन १९४८ च्या ” हे शब्द व आकडे दाखल करावे.

(२) कलम ४ मध्ये पोट-कलम (१) ऐवजी पुढील पोट-कलम दाखल करावे :—

“ (१) कोणत्याही स्थानिक क्षेत्रात सामान्यतः वास्तव्य करणाऱ्या कोणत्याही कर्जदारास किंवा त्याच्या धनकोस न्यायालयाकडे त्यांच्या कर्जाची तोडजोड करण्यासाठी तारीख ३१ माहे जानेवारी सन १९५० रोजी किंवा त्यापूर्वी अर्ज करण्याचा अधिकार आहे. ”

(३) कलम ७ मध्ये “ तारीख १ माहे जानेवारी सन १९३८ ” या शब्दांच्या व आकड्यांच्या ऐवजी “ तारीख १ माहे जानेवारी सन १९४९ ” हे शब्द व आकडे दाखल करावे.

(४) कलम २२ मध्ये आणखी पुढील परंतुक दाखल करावे :—

“ तसेच, शेतकऱ्यांच्या कर्जाची तडजोड किंवा तोडजोड करण्यासंबंधी ह्या अधिनियमासारखा जो कोणताही विधि बडोदे व दांता संस्थानांत अंमलात असेल त्याअन्वये सक्षम न्यायाधिकरणाने किंवा प्राधिकाऱ्याने धनकोस येणे असलेली कोणतीही रक्कम ठरविली असेल तेव्हा, अशा रीतीने ठरविलेली रक्कम सर्व पक्षास बंधनकारक राहील. ”.

(५) कलम २३ मध्ये, परंतुकात, “ १८७९ ” या आकड्यांच्या नंतर “ किंवा त्यासारखा कोणताही अधिनियम ”हे शब्द दाखल करावे.

(६) कलम २४, पोट-कलम (२) यात, “ तारीख १ माहे ऑगस्ट सन १९४७ ” या शब्दांच्या व आकड्यांच्या ऐवजी “ तारीख १ माहे फेब्रुवारी सन १९५० ” हे शब्द व आकडे दाखल करावे.

(७) कलम २५ मध्ये–

(१) कंडिका (१) मध्ये, “ किंवा रद्द केलेल्या अधिनियमांचे कलम ४ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या मंडळाने ” हे शब्द गाळण्यात यावे.

(२) कंडिका (२) मध्ये “ तारीख १५ माहे फेब्रुवारी सन १९३९ ” या शब्दांच्या व आकड्यांच्या ऐवजी “ तारीख १ माहे जानेवारी सन १९४९ ” हे शब्द व आकडे दाखल करावे.

(८) कलम ३२, पोट-कलम (२) मध्ये—

(१) कंडिका (क) ऐवजी पुढील कंडिका दाखल करावी :–

“ (क) साधनसंस्थांनी किंवा कलम ५४ अन्वये कर्ज देण्यास अधिकृत केलेल्या इसमांनी पिकांसाठी पैसा पुरविण्याकरिता किंवा हंगामी पैसा पुरविण्याकरिता “ दिलेली कर्जे ”.



(२) स्पष्टीकरणात “ रद्द केलेल्या अधिनियमाअन्वये ” आणि “ ह्या अधिनियमाअन्वये ” हे शब्द गाळण्यात यावे.

(९) कलम ५६, पोट-कलम १ मध्ये—

(१) “ दक्षिणेतील शेतकऱ्यांस साहाय्य देण्याबाबत अधिनियम, १८७९, हा मुंबई कर्जदार शेतकरी साहाय्य अधिनियम, १९३९, अन्वये रद्द करण्यात आला असला तरी, प्रथम निर्दिष्ट अधिनियम हा, “ दक्षिणेतील शेतकऱ्यांस साहाय्य देण्याबाबत अधिनियम यासारखा उक्त संस्थानांत अंमलात असलेला कोणताही अधिनियम रद्द करण्यात आला असला तरी, असा अधिनियम हा ” हे शब्द व आकडे दाखल करावे ”.

| अधिनियम<br>(१) | संस्थानांची नावे<br>(२) | सुधारणा<br>(३) |
|---|---|---|
| | | (२) “ प्रस्तुत अधिनियम अंमलात आल्याच्या तारखेपासून (जिचा उल्लेख ह्या कलमात यापुढे उक्त तारीख म्हणून केला आहे) ” हे शब्द व कंस गाळण्यात यावे.<br>(३) “ उक्त तारखेपासून तीन वर्षांच्या मुदतीपर्यंत ” या शब्दांच्या ऐवजी “ तारीख २६ माहे मे सन १९५० पर्यंत ” हे शब्द व आकडे दाखल करावे.<br>(४) पहिल्या परंतुकाच्या ऐवजी पुढील परंतुक दाखल करावे :—<br>“ परंतु, तारीख २६ माहे मे सन १९५० रोजी किंवा त्यापूर्वी कोणत्याही दाव्यातील किंवा दाव्यातून उद्भवणारे कोणतेही काम हे उक्त तारखेनंतर जणू दक्षिणेतील शेतकऱ्यांस साहाय्य देण्याबाबत अधिनियम, १८७९, यासारखा अधिनियम उक्त तारखेनंतर अंमलात असण्याचे चालू होते असे समजून चालू ठेऊन निकालात काढले पाहिजे ”. |
| मुंबई भाडे नियंत्रण आणि पथिकाश्रम व निवासगृह दर नियंत्रण अधिनियम, १९४७ (सन १९४७ चा मुंबई अधिनियम ५७). | बडोदे . . . . . . . . . | (१) कलम ५, कंडिका (१०) ऐवजी पुढील कंडिका दाखल कराव्या :—<br>“ (१०) निर्दिष्ट केलेली तारीख म्हणजे—<br>(अ) राहण्याच्या कारणासाठी भाड्याने दिलेल्या कोणत्याही जागेच्या बाबतीत, तारीख १ माहे जानेवारी सन १९४३, आणि<br>(ब) निवासेतर कारणासाठी भाड्याने दिलेल्या कोणत्याही जागेच्या बाबतीत, तारीख १ माहे जानेवारी सन १९४४.<br>(१०-अ) राहण्याच्या कारणासाठी किंवा निवासेतर कारणासाठी भाड्याने दिलेल्या कोणत्याही जागेच्या संबंधात “ प्रमाण भाडे ” या संज्ञेचा अर्थ पुढीलप्रमाणे समजावा :—<br>(अ) जेव्हा प्रमाण भाडे बडोदे सरकारने दिलेला घरभाडे नियंत्रण आदेश, १९४७, याअन्वये नियंत्रकाने ठरविले असेल तेव्हा असे प्रमाण भाडे अथवा |

(ब) जेव्हा प्रमाण भाडे अशा रीतीने ठरविलेले नसेल तेव्हा कलम ११ च्या उपबंधास अधीन राहून—

(१) निर्दिष्ट केलेल्या तारखेपूर्वी जागा ज्या भाड्याने दिलेली होती ते भाडे, अथवा

(२) निर्दिष्ट केलेल्या तारखेस जागा भाड्याने दिलेली नसेल तेव्हा त्या तारखेपूर्वी ती शेवटी ज्या भाड्याने दिलेली असेल ते भाडे, अथवा

(३) निर्दिष्ट केलेल्या तारखेनंतर जागा प्रथम भाड्याने दिलेली असेल तेव्हा, ती प्रथम ज्या भाड्याने दिलेली असेल ते भाडे, अथवा

(४) कलम ११ मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही बाबतीत, न्यायालयाने ठरविलेले भाडे :

परंतु, उक्त घरभाडे नियंत्रण आदेश, १९४७, यास अनुसरून तारीख ३० माहे जुलै सन १९४९ च्या निकटपूर्वी अस्तित्वात असलेली कोणतीही भाडेवाढ प्रमाणभाड्यात समाविष्ट होते असे समजले पाहिजे ; ”

(२) उक्त अधिनियमाची कलमे ७, ११ व १८ यात “ तारीख १ माहे सप्टेंबर सन १९४० ” हे शब्द आकडे जेथे जेथे येतात तेथे तेथे त्याच्याऐवजी “ निर्दिष्ट केलेली तारीख ” हे शब्द दाखल करावे.

| | | |
|---|---|---|
| मुंबई ऊस उपकर अधिनियम, १९४८ (सन १९४८ चा मुंबई अधिनियम ८२). | कोल्हापूर संस्थान—उक्त संस्थानाच्या हद्दीतील जहागिऱ्या धरून. | उक्त अधिनियमाचे कलम १५ यातील “ तारीख १ माहे जानेवारी सन १९४८ ” या शब्दांच्या व आकड्यांच्या ऐवजी “ तारीख १ माहे मार्च सन १९४९ ” हे शब्द व आकडे दाखल करावे. |
| मुंबई ऊस उपकर अधिनियम, १९४८ (सन १९४८ चा मुंबई अधिनियम ८२). | अक्कल-कुरुंदवाड रामदुर्ग, कोट (धाकटी सांगली, औंध, पाती), सावनूर, भोर, मिरज सातववाडी | कलम १५ मध्ये, “ तारीख १ माहे जानेवारी १९४८ ” या शब्दांच्या व आकड्यांच्या ऐवजी “ तारीख २३ मार्च सन १९४८ ” हे शब्द व आकडे दाखल करावे. |

**तिसरी अनुसूची —** (चालू)

| अधिनियम<br>(१) | संस्थानांची नावे<br>(२) | सुधारणा<br>(३) |
|---|---|---|
| | जमखंडी (मोठी वाडी जागीर<br>पाती)<br>जत मिरज<br>कुरुंदवाड (धाकटी<br>(मोठी पाती)<br>पाती) मुधोळ<br>फलटण. | |
| मुंबई ऊस उपकर अधिनियम, १९४८ (सन १९४८ चा मुंबई अधिनियम ८२). | जंजिरे . . . . . . | कलम १५ मध्ये, " तारीख १ माहे जानेवारी सन १९४८ " या शब्दांच्या व आकड्यांच्या ऐवजी " तारीख १८ माहे एप्रिल सन १९४८ " हे शब्द व आकडे दाखल करावे. |
| मुंबई ऊस उपकर अधिनियम, १९४८ (सन १९४८ चा मुंबई अधिनियम ८२). | अंबालिआरा मालपूर वसोंडा<br>वाडासीनोर माणसा वासणा<br>बांसदा मोहनपूर विजय-<br>बारिया पालनपूर नगर<br>भादेखा पुनाद्रा वाव.<br>खंबायत राधनपूर<br>छोटा उदेपूर राजपिपळा<br>धरमपूर (सेगबारा<br>घोडासर धरून)<br>इडार राणासन | कलम १५ मध्ये, " तारीख १ माहे जानेवारी सन १९४८ " या शब्दांच्या व आकड्यांच्या ऐवजी " तारीख २८ माहे मे सन १९४८ " हे शब्द व आकडे दाखल करावे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | इलोल | सांचीन | | |
| | जंबुघोडा | संजेली | | |
| | जव्हार | संत | | |
| | कटोसण | सुदासणा | | |
| | खंडाल | सुरगणा | | |
| | लुणावाडा. | थराड | | |
| | | वालसाणा. | | |
| मुंबई ऊस उपकर अधिनियम, १९४८ (सन १९४८ चा मुंबई अधिनियम ८२). | दांता | . . . | . . . | कलम १५ मध्ये, “ तारीख १ माहे जानेवारी सन १९४८ ” या शब्दांच्या व आकड्यांच्या ऐवजी “ तारीख ४ माहे नोव्हेंबर सन १९४८ ” हे शब्द व आकडे दाखल करावे. |
| मुंबई जिल्हा नगरपालिका अधिनियम, १९०१ (सन १९०१ चा मुंबई अधिनियम ३). | बडोदे | . . . | . . . | कलम ७४ नंतर पुढील कलम दाखल करावे :— <br> “ **७४-अ.**——करांच्या बाबतीत दिलेली माफी किंवा सवलत काढून घेण्याचा सरकारचा अधिकार.—राज्य सरकारास, कोणत्याही वेळी, लेखी आदेशाद्वारे, पूर्वीच्या बडोदे संस्थानाच्या सरकारने ‘अ ’ वर्ग नगरपालिका अधिनियम (सन १९४९ चा बडोदे अधिनियम १२) अन्वये दिलेल्या आदेशानुसार कोणत्याही कराच्या बाबतीत कोणत्याही इसमास दिलेली कोणतीही माफी किंवा सवलत काढून घेण्याचा अधिकार आहे. ” <br> (२) कलम ९१-अ मध्ये— <br> (१) पोट-कलम (२) नंतर पुढील पोट-कलम दाखल करावे :— <br> (२-अ) पूर्वीच्या बडोदे संस्थानच्या सरकारने तारीख ३० जुलै १९४९ पूर्वी कोणत्याही वेळी विहित केलेली किंवा मंजूर केलेली सार्वजनिक सडकेची प्रत्येक नियमित रेषा राखणे हे प्रत्येक नगरपालिकेचे कर्तव्य असेल : |

**तिसरी अनुसूची** — (चालू)

| अधिनियम | संस्थानांची नावे | सुधारणा |
| --- | --- | --- |
| (१) | (२) | (३) |

परंतु, रहदारीच्या दृष्टीने आवश्यक गोष्टीकडे लक्ष्य पुरविल्यानंतर जर—

(अ) नगरपालिकेने पूर्वीच्या बडोदे संस्थानच्या सरकारची मंजुरी घेऊन उक्त तारखेपूर्वी अशी नियमित रेषा अनावश्यक या वर्गात घातली असेल तर, अथवा

(ब) मुंबई विलीन संस्थाने (विधि) (वित्तीय सुधारणा) अधिनियम, १९५१, अंमलात येण्याच्या तारखेपूर्वी दोन वर्षांच्या आत नगरपालिकेने राज्य सरकारच्या मंजुरीने अशी नियमित रेषा वर सांगितल्याप्रमाणे अनावश्यक या वर्गात घातली असेल तर, नगरपालिकेस अशा नियमित रेषेत फेरफार करण्याचा किंवा ती रद्द करण्याचा अधिकार आहे ".



(२) पोट-कलम (३) मध्ये शेवटी पुढील मजकूर दाखल करावा :—

" **स्पष्टीकरण.—**ह्या कलमाच्या प्रयोजनाकरिता ' सार्वजनिक सडकेची नियमित रेषा ' या संज्ञेत पूर्वीच्या बडोदे संस्थानच्या सरकारने तारीख ३० माहे जुलै सन १९४९ पूर्वी कोणत्याही वेळी विहित केलेल्या किंवा मंजूर केलेल्या सार्वजनिक सडकेच्या नियमित रेषेचा समावेश होतो. ".

(३) मुंबई जिल्हा नगरपालिका अधिनियम, १९०१ (सन १९०१ चा मुंबई अधिनियम ३), कलम १८० नंतर पुढील कलम दाखल करावे :—

" **१८०-अ.** (१) ह्या अधिनियमाच्या मागील उपबंधांत काहीही असले तरी, पूर्वीच्या बडोदे संस्थानचा अ वर्ग नगरपालिका अधिनियम (सन १९४९ चा बडोदे अधिनियम क्रमांक १२) किंवा ब वर्ग नगरपालिका अधिनियम (सन १९४९ चा बडोदे अधिनियम क्रमांक १४) याअन्वये रचना करण्यात आलेल्या

(शा.म.मु.) एच ४१३६—६ (२५२४—२-२०१६)

कोणत्याही नगरपालिकांनी किंवा नगरपालिकांच्या बाबतीत (त्याचा उल्लेख यात यापुढे अनुक्रमे " उक्त नगरपालिका अधिनियम " व " उक्त नगरपालिका "असा केला आहे) उक्त नगरपालिका अधिनियमान्वये जे नियम, उपविधि किंवा आदेश केले, दिले किंवा मंजूर केले असतील व जे तारीख ३० माहे जुलै सन १९४९ च्या निकटपूर्वी अंमलात असतील ते सर्व उक्त अधिनियमाच्या समुचित उपबंधांअन्वये उक्त तारखेस उक्त नगरपालिकांनी किंवा त्यांच्या बाबतीत केले, दिले किंवा मंजूर केले आहेत असे समजले पाहिजे आणि सक्षम अधिकाऱ्याकडून त्यात फेरफार करण्यात येईपर्यंत ते रद्द करण्यात येईपर्यंत किंवा त्यात सुधारणा करण्यात येईपर्यंत अंमलात असण्याचे चालू राहील.

(२) अशा नियमात, उपविधीत किंवा आदेशात बडोदे सरकार किंवा बडोदे सरकारचा कोणताही अधिकारी यासंबंधी केलेले सर्व उल्लेख हे यथास्थिति मुंबई सरकार किंवा मुंबई सरकारचा तत्सम अधिकारी यासंबंधीचे उल्लेख आहेत असे समजून त्याचा अर्थ लावण्यात आला पाहिजे आणि असे नियम, उपविधि किंवा आदेश यांअन्वये दिलेली सर्व लैसेन्से, परवाने किंवा परवानगी ही देखील, सक्षम अधिकाऱ्याकडून ती निष्प्रभावित करण्यात येईपर्यंत किंवा त्यात फेरफार करण्यात येईपर्यंत अंमलात असण्याचे चालू राहील.". 

मुंबई बरो नगरपालिका अधिनियम, १९२५ (सन १९२५ चा मुंबई अधिनियम १८). बडोदे . . . . . .

(अ-१) कलम ४ नंतर पुढील कलम दाखल करावे :—

" **४-अ.** तारीख १ माहे ऑगस्ट सन १९४९ पासून काही औद्योगिक क्षेत्रे बडोदे नगरपालिका क्षेत्रात समाविष्ट करणे.—(१) हा अधिनियम किंवा मुंबई जिल्हा नगरपालिका अधिनियम, १९०१ (ज्याचा उल्लेख यात यापुढे जिल्हा नगरपालिका अधिनियम असा केला आहे) यात ॲलेंबिक केमिकल वर्क्स कं. लिमिटेड, हिच्या उत्तरेकडील औद्योगिक विभाग या नावाने ओळखण्यात येणारे क्षेत्र आणि उक्त केमिकल वर्क्सने व्यापलेले आणि अनुसूची १-अ मध्ये वर्णन केलेले क्षेत्र—ज्यांचा उल्लेख यात यापुढे " उक्त क्षेत्रे " म्हणून केला आहे ही तारीख १ माहे ऑगस्ट सन १९४९ पासून तारीख ३० माहे एप्रिल सन १९५० च्या

**तिसरी अनुसूची** — (चालू)

| अधिनियम | संस्थानांची नावे | सुधारणा |
| --- | --- | --- |
| (१) | (२) | (३) |
| | | मुदतीपर्यंत (दोन्ही धरून) पूर्वीच्या बडोदे नगरपालिका जिल्ह्यातील हद्दीत आणि तारीख १ मे १९५० पासून बडोदे नगरपालिका बरोच्या हद्दीत समाविष्ट करण्यात आली आहेत असे समजले पाहिजे.<br><br>(२) जिल्हा नगरपालिका अधिनियम किंवा हा अधिनियम याअन्वये उक्त क्षेत्राच्या बाबतीत केलेली किंवा केल्याचा आशय असलेली कोणतीही नेमणूक, योजना, नियम, उपविधि किंवा नमुना अथवा काढलेली किंवा काढल्याचा आशय असलेली कोणतीही अधिसूचना अथवा दिलेली किंवा दिल्याचा आशय असलेली कोणतीही नोटीस, आदेश, लैसेन्स किंवा परवानगी अथवा बसविलेल्या किंवा बसविल्याचा आशय असलेला कोणताही कर आणि कोणतीही अशी नेमणूक, योजना, नियम, उपविधि, नमुना, अधिसूचना, नोटीस, आदेश, लैसेन्स, परवानगी किंवा कर यासंबंधी केलेली किंवा केल्याचा आशय असलेली कोणतीही गोष्ट या सर्व गोष्टी, यथास्थिति जिल्हा नगरपालिका अधिनियमाच्या किंवा त्या अधिनियमाच्या उपबंधांशी त्या विसंगत नसतील तेथवर, वैध व मान्य असतील आणि त्या ज्या तारखेस यथास्थिति करण्यात, काढण्यात, देण्यात किंवा बसविण्यात आल्या असतील त्या तारखेस उक्त क्षेत्राच्या बाबतीत वैध व मान्य होत्या असे समजले पाहिजे आणि ह्या अधिनियमाअन्वये केलेली कोणतीही इतर नेमणूक, योजना, नियम, उपविधि किंवा नमुना अथवा काढलेली कोणतीही इतर अधिसूचना अथवा दिलेली कोणतीही इतर नोटीस, लैसेन्स किंवा परवानगी किंवा बसविलेला कोणताही इतर कर अथवा केलेली कोणतीही इतर गोष्ट याअन्वये त्या रद्द करण्यात आल्या नसतील तर आणि रद्द करण्यात येईपर्यंत त्या अंमलात असण्याचे चालू राहील. ”. |

(अ-२) अनुसूची १ नंतर पुढील अनुसूची दाखल करावी :—

**“ अनुसूची १-अ**

सुभानपुरा गावाचा भूमापन क्रमांक १०४ याच्या आग्नेय कोपऱ्यापासून सुरू होऊन आणि भूमापन क्रमांक १०५, १०२, १०६, १४९, १५०, १५६/१ व १५७ यांच्या उत्तर हद्दीच्या बाजूने जाऊन, नंतर रस्ता ओलांडून आणि भूमापन क्रमांक ९४ च्या नैऋत्य कोपऱ्यापासून निघून, उत्तरेस सुभानपुरा गावाच्या गावठाणाच्या हद्दीने भूमापन क्रमांक ९२ पर्यंत जाऊन, आणि गोर्वा गावाचे भूमापन क्रमांक ११०७, ११०८, ११०९, १११६, १११७, १११८, ११२३, १६८, २२, २१, १७ व १८ यांच्या मधून जाऊन, नंतर पूर्वेस वळून आणि भूमापन क्रमांक १९ व २० यांच्यामधून जाऊन, नंतर तो रस्ता छेदून आणि उत्तरेस वळून आणि नंतर गोर्वा गावाच्या गावठाणाच्या हद्दीने आग्नेय कोपऱ्यापर्यंत जाणारा रस्ता ओलांडून, नंतर तो रस्ता छेदून आणि उत्तरेस वळून आणि उत्तरेस गोर्वा गावाच्या गावठाणाच्या बाजूने जाणाऱ्या रस्त्याच्या पश्चिम हद्दीच्या बाजूने जाऊन, नंतर भूमापन क्रमांक १, २, ६२६, ६२७, ६२८ व ६२४ यांच्यामधून औद्योगिक क्षेत्राच्या उत्तर टोकापर्यंत जाऊन, नंतर पूर्वेस वळून आणि औद्योगिक क्षेत्राच्या भूमापन क्रमांक ६२४ याच्या वायव्य कोपऱ्यापर्यंत येऊन आणि नंतर त्या रस्त्याच्या उत्तर कडेच्या बाजूने चालत जाऊन, तो रस्ता ओलांडून आणि भूमापन क्रमांक ६२४ व ६२८ मधून जाऊन, तो रस्ता ओलांडून आणि भूमापन क्रमांक ७००, ६९९, ६९८, ६९४, ६९५, ७६०, ७६१, ७५९, ७५८, ७६६, ७६७, ७५४ व ७६८ यांमधून भूमापन क्रमांक ७६९ मधील औद्योगिक क्षेत्राच्या ईशान्य कोपऱ्यापर्यंत जाऊन, नंतर दक्षिणेस वळून व भूमापन क्रमांक ७५३, ७५२, ७५१, १०१४/१, १०१३, १०११/१, १०१०/१, १००९, १००७/१-२, १००६, १००५/१-२, १००४, १००३/१, १००१, १०००, ९९९ यांच्या पूर्व हद्दीच्या बाजूने जाऊन आणि नंतर अलेंबिक केमिकल वर्क्सच्या रेल्वे सायडींगच्या बाजूने जाऊन ती मुख्य मार्गाला मिळते त्या ठिकाणापर्यंत चालत जाऊन, नंतर पश्चिमेस वळून आणि गोर्वा गावाचा भूमापन क्रमांक ९८४ याच्या दक्षिण हद्दीस येऊन आणि भूमापन क्रमांक ६२७, ६२६, ६२५ व ६२४ यांच्या पूर्व हद्दीच्या बाजूने त्याच्या आग्नेय कोपऱ्यापर्यंत चालत जाऊन आणि नंतर पश्चिमेस वळून आणि त्याच्या दक्षिण हद्दीच्या बाजूने

| अधिनियम | संस्थानांची नावे | सुधारणा |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |

जाऊन आणि सर्व्हे न. ६२३ याच्या नैऋत्य कोपऱ्यास येऊन आणि नंतर भूमापन क्रमांक ६२३ व ६२२ यांच्या हद्दीच्या बाजूने उत्तरेस वळून आणि नंतर रस्ता ओलांडून आणि गोर्वा गावाचा भूमापन क्रमांक १०८४ याच्या आग्नेय कोपऱ्यापर्यंत जाऊन आणि भूमापन क्रमांक १०८४, १०८५, १०८८, १०९१ व १०९२ यांच्या दक्षिण हद्दीच्या बाजूने पश्चिमेस वळून औद्योगिक विभागाच्या मुख्य रस्त्याला मिळणारे क्षेत्र.

(१) कलम १०३ नंतर पुढील कलम दाखल करावे :–

“ **१०३-अ**. करांच्या बाबतीत दिलेली माफी किंवा सवलत काढून घेण्याचा सरकारचा अधिकार.– राज्य सरकारास कोणत्याही वेळी, लेखी आदेशाद्वारे, पूर्वीच्या बडोदे संस्थानाच्या सरकारने ‘ अ ’ वर्ग नगरपालिका अधिनियम (सन १९४९ चा बडोदे अधिनियम, १२) अन्वये दिलेल्या आदेशानुसार कोणत्याही कराच्या बाबतीत कोणत्याही इसमास दिलेली कोणतीही माफी किंवा सवलत काढून घेण्याचा अधिकार आहे. ”.

(२) कलम ११८ मध्ये–

(१) पोट-कलम (२) नंतर पुढील पोट-कलम दाखल करावे :–

“ (२-अ) पूर्वीच्या बडोदे संस्थानच्या सरकारने तारीख ३० जुलै १९४९ पूर्वी कोणत्याही वेळी विहित केलेली किंवा मंजूर केलेली सार्वजनिक सडकेची प्रत्येक नियमित रेषा राखणे हे प्रत्येक नगरपालिकेचे कर्तव्य असेल :

परंतु, रहदारीच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या गोष्टींकडे लक्ष्य पुरविल्यानंतर जर—

(अ) नगरपालिकेने पूर्वीच्या बडोदे सरकारची मंजुरी घेऊन उक्त तारखेपूर्वी अशी नियमित रेषा अनावश्यक या वर्गात घातली असेल तर, अथवा

| | | |
|---|---|---|
| | | (ब) मुंबई विलीन संस्थाने (विधि) (द्वितीय सुधारणा) अधिनियम, १९५१, अंमलात येण्याच्या तारखेपूर्वी दोन वर्षांच्या आत नगरपालिकेने राज्य सरकारच्या मंजुरीने अशी नियमित रेषा वर सांगितल्याप्रमाणे अनावश्यक या वर्गात घातली असेल तर,<br>नगरपालिकेस, अशा नियमित रेषेत फेरफार करण्याचा किंवा ती रद्द करण्याचा अधिकार आहे. ”.<br>(२) पोट-कलम (३) मध्ये शेवटी पुढील मजकूर दाखल करावा :—<br>“ **स्पष्टीकरण.**—ह्या कलमाच्या प्रयोजनांकरिता ‘ सार्वजनिक सडकेची नियमित रेषा ’ या संज्ञेत पूर्वीच्या बडोदे संस्थानच्या सरकारने तारीख ३० जुलै १९४९ पूर्वी कोणत्याही वेळी विहित केलेल्या किंवा मंजूर केलेल्या सार्वजनिक सडकेच्या नियमित रेषेचा समावेश होतो. ”. |
| मुंबई वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९३८ (सन १९३८ चा मुंबई अधिनियम २६). | सर्व विलीन संस्थाने . . . . . . | कलम १, पोट-कलम (३) मध्ये पुढील परंतुक दाखल करावे :—<br>“ परंतु, सर्व विलीन संस्थानांत भाग ३ हा राज्य सरकार याबाबत राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे निर्दिष्ट करील त्या तारखेस अंमलात येईल. मग वर सांगितलेली यथास्थिति दोन वर्षांची किंवा पांच वर्षांची मुदत ही भाग १ व २ उक्त संस्थानांच्या भाग बनलेल्या कोणत्याही क्षेत्रात ज्या तारखेस अंमलात आले असतील त्या तारखेस संपलेली असली तरी हरकत नाही. ”. |
| मुंबई वैद्यक अधिनियम, १९१२ (सन १९१२ चा मुंबई अधिनियम ६). | सर्व विलीन संस्थाने . . . . . . | कलम ८ नंतर पुढील नवीन कलम दाखल करावे :—<br>“ **८-अ.** विलीन संस्थानातील नोंदलेल्या वैद्यक व्यवसायींची नोंदणी (१) कलम ७ मध्ये काहीही असले तरी,—<br>(अ) विलीन संस्थानात त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधिअन्वये ठेवलेल्या वैद्यक व्यवसायींच्या नोंदवहीत ज्याचे नाव संस्थान मुंबई राज्यात विलीन झाल्याच्या तारखेच्या निकटपूर्वी, वैद्यक व्यवसायी म्हणून नोंदलेले असेल, आणि |

**तिसरी अनुसूची —** (समाप्त)

| अधिनियम<br>(१) | संस्थानांची नावे<br>(२) | सुधारणा<br>(३) |
| --- | --- | --- |
| | | (ब) भारतीय वैद्यक परिषद अधिनियम, १९३३, यास किंवा ह्या अधिनियमास जोडलेल्या अनुसूचीत निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही पात्रता जो धारण करीत असेल असा प्रत्येक इसम ह्या अधिनियमाअन्वये नोंदलेला वैद्यक व्यवसायी आहे असे समजले पाहिजे.<br>(२) कोणताही इसम पोट-कलम (१) अन्वये नोंदलेला वैद्यक व्यवसायी म्हणून समजण्यात येणारा इसम आहे किंवा कसे याविषयी कोणताही प्रश्न उद्‌भवल्यास, ती बाब मुंबई सरकारचा महाशल्य चिकित्सक याजकडे निर्णयासाठी पाठविण्यात आली पाहिजे व महाशल्य चिकित्सकाचा निर्णय अखेरचा असेल. ”. |
| मुंबई वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९३८ (सन १९३८ चा मुंबई अधिनियम २६). | सर्व विलीन संस्थाने . . . . . . | (१) कलम १७ नंतर पुढील नवीन कलम दाखल करावे :—<br>“ **१७-अ.**—विलीन संस्थानातील नोंदलेल्या इसमांची नोंदणी.—(१) कलम १६ मध्ये काहीही असले तरी, ह्या अधिनियमासारखा जो कोणताही विधि विलीन संस्थानात त्या त्या वेळी अंमलात असेल त्याअन्वये ठेवलेल्या व्यवसायींच्या नोंदवहीत ज्याचे नाव संस्थान मुंबई राज्यात विलीन झाल्याच्या तारखेच्या निकटपूर्वी व्यवसायी म्हणून नोंदलेले असेल अशा प्रत्येक इसम ह्या अधिनियमाअन्वये नोंदलेला व्यवसायी आहे असे समजले पाहिजे.<br>(२) कोणताही इसम पोट-कलम (१) अन्वये नोंदलेला व्यवसायी म्हणून समजण्यात येणारा इसम आहे किंवा कसे याविषयी कोणताही प्रश्न उद्‌भवल्यास, ती बाब मुंबई सरकारचा महाशल्यचिकित्सक याजकडे निर्णयासाठी पाठविण्यात आली पाहिजे आणि महाशल्यचिकित्सकाचा निर्णय अखेरचा असेल. ”. |

(१) कलम १८ नंतर पुढील नवीन कलम दाखल करावे :—

“ **१८-१-अ.**—विलीन संस्थानात नोंदलेल्या इतर इसमांची नोंदणी.—(१) मुंबई वैद्यक अधिनियम, १९१२, कलम ८-अ किंवा ह्या अधिनियमाचे कलम १७-अ यात निर्दिष्ट केलेल्या इसमाव्यतिरिक्त इतर ज्या इसमाचे नाव संस्थान मुंबई राज्यात विलीन झाल्याच्या तारखेच्या निकटपूर्वी, वर सांगितलेल्या अधिनियमांपैकी कोणत्याही अधिनिमासारख्या त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अधिनियमाअन्वये ठेवलेल्या नोंदवहीत नोंदलेले असेल, त्याचे नाव यादीत दाखल करण्यात आले पाहिजे.

(२) एखाद्या इसमास पोट-कलम (१) अन्वये यादीत नाव दाखल करून घेण्याचा हक्क आहे किंवा कसे याविषयी कोणताही प्रश्न उद्‌भवल्यास ती बाब मुंबई सरकारचा महाशल्यचिकित्सक याजकडे निर्णयासाठी पाठविण्यात आली पाहिजे आणि महाशल्यचिकित्सकाचा निर्णय अखेरचा असेल. ”.

| | | |
|---|---|---|
| मुंबई स्थानिक मंडळ अधिनियम, १९२३ (सन १९२३ चा मुंबई अधिनियम ६). | सर्व विलीन संस्थाने . . . . . . | कलम ९३ मध्ये पुढील पोट-कलम दाखल करावे :—<br>“ (३) पोट-कलम (१) मध्ये काहीही असले तरी, राज्य सरकारास, कोणत्याही क्षेत्रातील आकारणीचा प्रमाणभूत दर लक्ष्यात घेतल्यानंतर **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे असा निदेश देण्याचा अधिकार आहे की, अधिसूचनेत निर्दिष्ट करण्यात येईल अशा क्षेत्रात निर्दिष्ट करण्यात येईल अशा मुदतीसाठी कोणताही उपकर वसूल करता कामा नये किंवा अशा क्षेत्रात अशा मुदतीसाठी निर्दिष्ट करण्यात येईल अशा कमी दराने उपकर वसूल करण्यात आला पाहिजे. ”. |



शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई